१०४ शतकोत्तर वाटचाल
एकमेव स्वतंत्र दैनिक
# नवाकाळ
NAVAKAL
• मुंबई, गुरुवार ९ जुलै, २०२६ • वर्ष-१०४, अंक-१२६, पाने-८, किंमत: ₹ ७
• R.N.I.No.1814/57 • Vol.- 104, Issue - 126 Marathi - Daily - Mumbai, 9 July, 2026 Page - 8 Price- Rs. 7/-
• संपादक- रोहित रमाकांत पांडे
24x7 : www.navakal.in Email- contact@navakal.in

नवाकाळच्या Digital बातम्या पाहण्यासाठी Scan करा!
मोदी मंत्रिमंडळात मोठा फेरबदल!
navakal.in
@navakal.news Navakal Digital Network @_NDN_Offical @NavakalNews

## थोडक्यात...

### कर्जमाफीची बैठक ऐनवेळी रद्द केली

**मुंबई** - कर्जमाफीबाबत आयोजित केलेल्या अधिकृत बैठकीस आज प्रवीण परदेशी यांनी ऐनवेळी उपस्थित राहण्यास असमर्थता दाखवल्यामुळे ही बैठक रद्द करण्यात आली. आ. बंटी पाटील, आ. रोहित पवार, महादेव जानकर व डॉ. अजित नवले यांच्यासह अनेक नेते व आमदार या बैठकीस उपस्थित होते. कर्जमाफीच्या अटी शर्तीमुळे शेतकऱ्यांवर मोठा अन्याय करण्यात आला आहे. त्याचा युक्तिवाद करणे शक्य नसल्यानेच बैठक रद्द करण्यात आली आहे, असा आरोप किसान सभेचे अजित नवले यांनी केला. मुख्यमंत्री कार्यालयातून दिलेल्या सूचनेनुसार ऐनवेळी प्रवीण परदेशींनी ही बैठक रद्द केली असे नवले म्हणाले. किसान सभेच्या वतीने सरकारच्या या कृतीचा निषेध करत कर्जमाफीसाठी तीव्र आंदोलनाचा इशारा किसान सभेने दिला.

# राजनाथ सिंह यांची राजकारणातून निवृत्ती?

## केंद्रीय मंत्रिमंडळात आता आयारामांना संधी?



**नरेंद्र मोदी मंत्रिमंडळात फेरबदलाची तयारी झाली आहे. या फेरबदलात देशाचे संरक्षण मंत्री व भाजपाचे ज्येष्ठ नेते राजनाथ सिंह यांना वगळले जाण्याची चर्चा आहे. त्यांना पुढे राष्ट्रपती पद दिले जाईल असे सांगितले जात असले तरी त्याची शक्यता नाही. राजनाथ सिंह यांचे १० जुलैला ७५ वय पूर्ण होते हेही कारण सांगितले जाते. पंतप्रधान मोदी यांच्यापेक्षा ज्येष्ठ असलेले नेते एकेक करून बाजूला जात आहेत. सुषमा स्वराज, अरूण जेटली व मनोहर पर्रिकर यांचे निधन झाले. लालकृष्ण अडवाणी यांना सल्लागार पदावर ठेवले. आता राजनाथ सिंह यांना मंत्रिपदावरून दूर करणे हे एक प्रकारे त्यांना सक्रिय राजकारणातून निवृत्त करण्यासारखेच असेल.**

■ नवी दिल्ली

**केंद्रीय** मंत्रिमंडळात बदल होणार असल्याची चर्चा गेले काही दिवस सुरू आहे. या फेरबदलात उत्तर प्रदेश आणि पंजाबसारख्या महत्त्वाच्या राज्यांत २०२७ मध्ये होणाऱ्या विधानसभा निवडणुका डोळ्यासमोर ठेवून पंतप्रधान नरेंद्र मोदी त्या राज्यातील नेत्यांना मंत्रिपद देतील अशी शक्यता आहे. यात केंद्रीय गृहमंत्री अमित शहा यांच्या गटातील नेत्यांना अधिक प्रतिनिधित्व मिळू शकते, अशीही चर्चा आहे. केंद्रात तरुण मंत्री यावेत असे धोरण असल्याचे सांगितले जात आहे.

राजनाथ सिंह भाजपामधील सर्वाधिक अनुभवी आणि वरिष्ठ नेत्यांपैकी एक मानले जातात. उत्तर प्रदेशचे मुख्यमंत्री, भाजपाचे राष्ट्रीय अध्यक्ष, केंद्रीय गृहमंत्री आणि सध्याचे संरक्षण मंत्री अशा विविध जबाबदाऱ्या त्यांनी यशस्वीपणे सांभाळल्या आहेत. त्यांना निवृत्त केल्यावर त्यांची नाराजी दूर करण्यासाठी त्यांच्या पारंपरिक लखनौ लोकसभा मतदारसंघातून त्यांचे पुत्र नीरज सिंह यांना उमेदवारी दिली जाईल. राजनाथ सिंह यांचे दोन्ही पुत्र सक्रिय राजकारणात आहेत.

भाजपात वयाच्या ७५ वर्षांनंतर नेत्याने निवृत्त व्हावे, असा अलिखित संकेत आहे. यानुसार वयाची पंचाहत्तरी पूर्ण करणारे लालकृष्ण अडवाणी, मुरली मनोहर जोशी, सुमित्रा महाजन यांना सक्रिय राजकारणातून निवृत्त व्हावे लागले होते. पंतप्रधान नरेंद्र मोदी यांनीही गेल्या वर्षी वयाची ७५ वर्षे पूर्ण केली. परंतु त्यांनी आपली निवृत्ती जाहीर केलेली नाही. मात्र, आता राजनाथ सिंह यांना तो नियम लागू करून त्यांना सक्रिय राजकारणापासून निवृत्त केले जात आहे, अशी चर्चा आहे. काही दिवसांपूर्वी राजनाथ सिंह यांना याविषयी विचारले असता ते म्हणाले होते की, भाजपात असा कोणताही नियम नाही. यापूर्वी वयाची ७५ वर्षे पूर्ण करणाऱ्या अनेक नेत्यांनी निवडणूक लढवली आहे.

या फेरबदलाच्या बाबतीत केंद्रीय गृहमंत्री अमित शहा यांनी नुकतीच महत्त्वाची बैठक घेतली. या बैठकीत झालेल्या चर्चेनुसार, मंत्रिमंडळ आता अधिक पान २ वर

### पाच मंत्र्यांना फटका

संभाव्य मंत्रिमंडळ फेरबदलाचा अर्थमंत्री निर्मला सीतारामन, पेट्रोलियम मंत्री हरदीप सिंग पुरी, शिक्षणमंत्री धर्मेंद्र प्रधान, राज्यमंत्री पंकज चौधरी आणि हर्ष मल्होत्रा या पाच मंत्र्यांना फटका बसू शकतो. यातील धर्मेंद्र प्रधान तसेच हरदीप सिंग पुरी यांच्या खात्यांमध्ये बदल करून त्यांना नव्या जबाबदाऱ्या दिल्या जाण्याची शक्यता वर्तवली जात आहे. नीट पेपरफुटीनंतर धर्मेंद्र प्रधान यांच्याकडून शिक्षण मंत्रालय काढून घेतले जाईल, अशी चर्चा आहे. मात्र, त्यांना बाहेरचा रस्ता दाखवला जाण्याची शक्यता कमी आहे. हरदीप पुरी यांचे नाव एपस्टिन फाईलमध्ये आले होते. याशिवाय त्यांचे वय ७४ आहे. वयाच्या मुद्यावर त्यांना मंत्रिपद सोडावेही लागू शकते. अर्थमंत्री निर्मला सीतारामन यांच्याबाबत कोणतीही नाराजी नसली तरी २०२९ पूर्वी अर्थव्यवस्थेबाबत पान २ वर

# ट्रम्प म्हणाले, युद्धबंदी संपली आखातात पुन्हा युद्ध भडकले

■ वॉशिंग्टन

**अमेरिका** आणि इराण या दोन देशांनी मान्य केलेली ६० दिवसांची युद्धबंदी अवघ्या दोन आठवड्यांत संपुष्टात आली. इराणने काल होर्मुजच्या सामुद्रधुनीत तीन तेलवाहू जहाजावर हल्ले केल्यानंतर आखातात पुन्हा युद्धाचा भडका उडाला आहे. प्रत्युत्तरादाखल अमेरिकेनेही आज इराणवर क्षेपणास्त्रांचा वर्षाव केला. त्यानंतर इराणने पुन्हा एकदा आखाती देशांना लक्ष्य करण्यास सुरुवात केली. ही धुमश्चक्री चालू असताना तुर्कीमधील अंकारा येथे नाटो राष्ट्रांच्या शिखर परिषदेदरम्यान बोलताना इराणबरोबरची युद्धबंदी संपली, अशी घोषणा अमेरिकेचे राष्ट्राध्यक्ष ट्रम्प यांनी केली. मध्य पूर्वेतील या घडामोडींचे तीव्र पडसाद भारतीय शेअर बाजारात उमटले. मुंबई शेअर बाजाराचा निर्देशांक सेन्सेक्स १,९०० अंकांनी कोसळला.

अमेरिका आणि इराणदरम्यान मागील चार महिन्यांपासून सुरू असलेल्या संघर्षाला काल इराणने होर्मुजमध्ये केलेल्या हल्ल्यामुळे पुन्हा एकदा धार चढली. इराणमध्ये अयातुल्ला



खामेनी यांचा दफनविधी चालू असतानाच इराणने हे हल्ले केले. या हल्ल्यांना प्रत्युत्तर म्हणून अमेरिकेने आज इराणच्या तब्बल ८० ठिकाणांवर क्षेपणास्त्र हल्ले केले. त्यानंतर इराणने आज बहारिनमधील अमेरिकन नौदलाच्या तळावर, तर कुवेतमधील अली अब सालेम या हवाई तळावर हल्ले करण्यात आले. पान ५ वर

### शेअर बाजारात विक्रमी पडझड

मध्य पूर्वेतील युद्ध पुन्हा सुरू होताच जगभरातील भांडवली बाजारांमध्ये त्याचे तीव्र पडसाद उमटले. भारतीय शेअर बाजारातही युद्धाच्या वृत्तामुळे हाहाकार माजला. मुंबई शेअर बाजाराचा निर्देशांक सेन्सेक्स तब्बल १,६७७.१२ अंकांनी कोसळला. तर राष्ट्रीय शेअर बाजाराचा निर्देशांक निफ्टी ५१६.६५ अंकांच्या घसरणीसह २३,८८२.०५ अंकांपर्यंत खाली आला. आजच्या या पडझडीमुळे गुंतवणूकदारांच्या संपत्तीमध्ये सुमारे ८.५६ लाख कोटी रुपयांची प्रचंड घट झाली. आज मुख्यत: बँकिंग, माहिती तंत्रज्ञान आणि ऊर्जा क्षेत्रातील कंपन्यांमध्ये विक्रीचा दबाव दिसून आला.

# मिसिंग लिंक आमच्या धाडसामुळे झाली महाराष्ट्राला उगाच बदनाम करू नका

■ मुंबई

**राज्यात** गेल्या काही दिवसांपासून होत असलेल्या पावसाचा फटका मुंबई-पुणे 'मिसिंग लिंक' प्रकल्पाला बसला होता. दोन महिन्यांपूर्वी गाजावाजा करत उद्घाटन केलेल्या या मार्गावरील बोगद्याच्या संरक्षक भिंतीचा काही भाग पुलावर कोसळल्याने वाहतूक ठप्प झाली. यावरून विरोधकांनी महायुती सरकार धारेवर धरल्यानंतर आज मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी त्यांना उत्तर दिले. ते म्हणाले की, मिसिंग लिंक आम्ही हिमतीने बांधली. मला शिव्या द्या, पण खोटारडेपणा करून महाराष्ट्राला बदनाम करू नका. राज्यातील पूरस्थिती, महायुतीने केलेले पायाभूत सुविधांचे प्रकल्प आणि सरकारने अनेक गोष्टींबाबत घेतलेले धाडसी निर्णय याच्यावरही त्यांनी सविस्तर भाष्य केले.

यावेळी देवेंद्र फडणवीस म्हणाले की, दरड वरून कोसळून पाण्याच्या कमानीवर पडली आणि त्यामुळे कमानीचा काही भाग तुटला. मात्र केबल-स्टेड पुलाला कुठेही तडे गेले नाहीत किंवा बोगद्यालाही कोणतेही नुकसान झाले नाही. काही लोकांनी असा प्रचार पान ७ वर

# १,६६० वारकऱ्यांच्या उपस्थितीत ज्ञानोबांच्या पालखीचे प्रस्थान

■ आळंदी

**'ज्ञानोबा** माऊली तुकाराम'च्या जयघोषात आज संध्याकाळी आळंदीतून संत ज्ञानेश्वर महाराजांच्या पालखीचे पंढरपूरकडे प्रस्थान झाले. मात्र मुसळधार पावसामुळे इंद्रायणी नदीला पूर आल्याने पोलिसांनी वारकऱ्यांना आळंदीबाहेरच थांबवले. पान ५ वर



# पुणे, ठाण्यात पावसाचा जोर कायम नद्यांना पूर! सतर्कतेचा इशारा

■ मुंबई

**ठाणे** आणि पुणे शहर, उपनगरे आणि पिंपरी-चिंचवडमध्ये पावसाचा जोर कायम असून, पवना आणि इंद्रायणी नद्यांच्या पाणीपातळीत वाढ झाली आहे. भारतीय हवामान विभागाने पुणे आणि पिंपरी-चिंचवडसाठी पुढील २४ ते ४८ तासांसाठी 'ऑरेंज अलर्ट' जारी केला आहे. घाटमाथ्यावर अतिमुसळधार, तर शहर परिसरात मध्यम ते तीव्र स्वरूपाचा पाऊस होण्याची शक्यता वर्तविण्यात आली आहे. नदीकाठच्या भागातील नागरिकांनी सतर्क राहावे, नदीपात्रात उतरू नये. तसेच अत्यावश्यक कामाशिवाय घराबाहेर पडू नये, असे आवाहन प्रशासनाने केले आहे.

ठाणे जिल्ह्यात गेल्या २४ तासांत जिल्ह्यात सरासरी ११६.२५ मिलिमीटर पावसाची नोंद झाली असून, हंगामातील एकूण सरासरी पर्जन्यमान ९७०.१३ मिलिमीटरवर पोहोचले आहे. गेल्या सात दिवसांत ३०८ नागरिकांचे सुरक्षितस्थळी स्थलांतर करण्यात आले आहे. जिल्हा आपत्ती व्यवस्थापन प्राधिकरणाच्या माहितीनुसार, मुरबाडमध्ये सर्वाधिक १७० मिलिमीटर पाऊस झाला. तर मिरा-भाईंदरमध्ये १३२, अंबरनाथमध्ये १२०, शहापूरमध्ये ११८, उल्हासनगरमध्ये ११२, कल्याणमध्ये १०५, ठाण्यात १०४ आणि भिवंडीत ६९ मिलिमीटर पान ७ वर

# केतनला संपवण्यापूर्वी सियाने गुगलवर शोधली ४ प्रश्नांची उत्तरे

■ पुणे

**पुण्यातील** केतन अग्रवाल हत्या प्रकरणातील मुख्य आरोपी सिया गोयल हिच्याविषयी एक नवी माहिती पोलीस तपासातून समोर आली आहे. केतनला लोहगडावरून ढकलून देण्यापूर्वी सियाने गुगलवर हत्या कशी करायची, पकडले गेल्यास काय करायचे याची सखोल माहिती घेतली होती. त्यासाठी तिने चार प्रश्न गुगलला विचारले होते, असे सियाच्या जबाबातून स्पष्ट झाले आहे.

अवघे वीस वर्षे वयाची सिया एखाद्या अट्टल गुन्हेगारासारखा विचार करून पद्धतशीरपणे नियोजन करून थंड डोक्याने गुन्हा करू शकते, याची जाणिव तिच्या जबाबावरून पोलिसांना झाली. केतनची हत्या करण्यापूर्वी तिने गुगलवरील माहिती, गुन्हेगारी कथांवर आधारित वेबसिरीज आणि काही पॉडकास्ट पाहिले होते. महिला गुन्हेगारांना पोलीस कोठडीत मारले जाते का, हत्येच्या गुन्ह्याची चौकशी पोलीस कशा पद्धतीने करतात, सोनम रघुवंशीला चौकशीदरम्यान पोलिसांनी कोणते प्रश्न विचारले होते आणि सोनम रघुवंशीला उच्च न्यायालयाने जामीन कोणत्या आधारावर दिला, हे चार प्रश्न सियाने गुगलला विचारले होते.

सविस्तर वाचण्यासाठी व शेअर करण्यासाठी हा क्युआर कोड स्कॅन करा

# एसआयटीच्या अहवालात चंपत राय यांचे नावच नाही

## राम मंदिर दान चोरी

■ अयोध्या

**राम** मंदिरातील देणगी चोरी प्रकरणाचा तपास करणाऱ्या विशेष तपास पथकाने (एसआयटी) सादर केलेल्या अहवालात ट्रस्टचे सरचिटणीस चंपत राय यांच्या नावाचा उल्लेखही नसल्याने उलट सुलट चर्चांना ऊत आला आहे. एसआयटीने चंपत राय यांना क्लीन चिट दिली की, या घोटाळ्यातील त्यांच्या भूमिकेचा तपास अद्याप सुरू असल्याने प्राथमिक अहवालात त्यांच्या नावाचा उल्लेख टाळण्यात आला आहे, असे प्रश्न राजकीय आणि सामाजिक वर्तुळात विचारले जाऊ लागले आहेत.



श्रीराम जन्मभूमी तीर्थक्षेत्र ट्रस्टकडे सादर केलेल्या या नऊ पानी प्राथमिक अहवालात एसआयटीने सुरक्षा व्यवस्थेतील गंभीर त्रुटी, कमकुवत पान ७ वर

### बद्रीनाथ मंदिर देणगी अपहार अध्यक्षांच्या पीएवर गुन्हा

**डेहराडून** - बद्रीनाथ-केदारनाथ मंदिर समितीच्या अध्यक्षांच्या कार्यालयातील स्वीय सहाय्यक प्रमोद नौटियाल याच्याविरुद्ध मंदिरातील देणगीचा अपहार केल्याच्या आरोपांप्रकरणी गुन्हा दाखल करण्यात आला. त्यामुळे खळबळ उडाली आहे. अयोध्या दान चोरी प्रकरणानंतर आता बद्रीनाथ-केदारनाथ मंदिरातही अपहर झाल्याचा गुन्हा दाखल झाला आहे. बद्रीनाथ पोलीस ठाण्यात भारतीय न्याय संहिता २०२३ मधील कलम ३०६ आणि ३१६(५) अंतर्गत एफआयआर नोंदविण्यात आला आहे. मंदिर समितीने दिलेल्या तक्रारीत नौटियाल याने मंदिरातील देणगीची रक्कम स्वत:कडे वळवल्याचा आरोप पान ७ वर

# मंत्रालयातील वीजपुरवठा खंडित डेटा डिलीट करण्याचा कट?

■ मुंबई

**राज्याच्या** कारभाराचे केंद्र असलेल्या मंत्रालयात आज सकाळी वीजपुरवठा खंडित झाल्याने काही काळ कामकाजावर परिणाम झाला. सकाळी सुमारे ७ वाजल्यापासून वीज नसल्याने मंत्रालयातील अनेक विभाग अंधारात होते. संगणक आणि इतर यंत्रणा बंद पडल्याने प्रशासकीय कामकाजही विस्कळीत झाले.

वीजपुरवठा खंडित झाल्यामुळे कर्मचारी कार्यालयात दाखल झाले असले तरी अनेक कामे रखडली होती. मंत्रालयातील बत्तीगुल प्रकरणावरून हा डेटा डिलीट करण्याचा कट आहे का? असा संशय भाजपा आमदार सुधीर मुनगंटीवार यांनी व्यक्त करत या घटनेची चौकशी करण्याची गरज असल्याचे म्हटले.

याबाबत सुधीर मुनगंटीवार म्हणाले की, मंत्रालयात अशी लाईट जाणे ही खूप मोठी बाब आहे. एखाद्या संगणकातील माहिती (डेटा) गायब करायची असेल, तर असे प्रकार होऊ शकतात. आजकाल असे कलाकार वाढले आहेत. त्यामुळे या घटनेकडे संशयाच्या नजरेने पाहण्याची गरज आहे. लंडनमध्ये ३५ वर्षांत वीज गेली नाही आणि आपल्या मंत्रालयात वीजपुरवठा खंडित होतो. आपण नेमके कोणत्या शतकात वावरत आहोत?

### सुधीर मुनगंटीवारांचा संशय

**पश्चिम बंगालमध्ये शाळांमधील मध्यान्ह भोजन योजना ही बचत गटांकडे न ठेवता इस्कॉनकडे दिली जाईल, असे मुख्यमंत्री सुवेंदू अधिकारी यांनी एका जाहीर कार्यक्रमात बोलताना सांगितले. त्यावरून निर्माण झालेला वाद आता कोलकाता उच्च न्यायालयात पोहोचला असून, सरकारने शपथपत्रावर भूमिका स्पष्ट करावी, असे निर्देश न्यायालयाने दिले आहेत.**

# शाळांमधील मध्यान्ह भोजन योजना इस्कॉनकडे देणार का?

■ कोलकाता

**ॲड.** सिरसन्या बंडोपाध्याय यांनी यासंदर्भात कोलकाता उच्च



न्यायालयात याचिका दाखल केली असून, ही शासकीय योजना इस्कॉनसारख्या संस्थेकडे सोपवण्यास विरोध केला आहे. पंतप्रधान पोषण (पंतप्रधान पोषण शक्ती निर्माण) योजनेअंतर्गत शाळांमध्ये विद्यार्थ्यांना देण्यात येणारे मध्यान्ह भोजन तयार करणे आणि त्याचे वितरण करणे याची जबाबदारी इस्कॉनकडे सोपवण्याचा सरकारचा मानस आहे, अशी माहिती मुख्यमंत्री सुवेंदू अधिकारी यांनी दिली होती. मात्र अद्याप या प्रस्तावावर सरकारने पुढे पाऊल टाकलेले नाही. याचिकाकर्त्यांचे असे म्हणणे आहे मध्यान्ह भोजन शिजवणे आणि पान ७ वर

### कोलकाता हायकोर्टाचा सरकारला सवाल

# जंतर-मंतरवर आंदोलन सुरूच सोनम वांगचुक यांचे वजन घटले

■ नवी दिल्ली

**नीट-यूजी** पेपरफुटी, परीक्षा व्यवस्थेतील कथित गैरप्रकार, शिक्षण क्षेत्रातील सुधारणा आणि केंद्रीय शिक्षणमंत्री धर्मेंद्र प्रधान यांच्या राजीनाम्याच्या मागणीसाठी जंतर-मंतर येथे सुरू असलेल्या आंदोलनाचा आज १९वा दिवस होता. या आंदोलनात सहभागी झालेले सामाजिक कार्यकर्ते सोनम वांगचुक सलग ११व्या दिवशी बेमुदत उपोषणावर ठाम असून, त्यांच्या प्रकृतीबाबत चिंता व्यक्त केली जात आहे.

आंदोलनस्थळी उपस्थित डॉक्टरांच्या माहितीनुसार, उपोषण सुरू झाल्यापासून वांगचुक यांचे ७ किलोहून अधिक वजन घटले आहे. त्यांचे वजन सध्या ५९.४० किलोपर्यंत कमी झाल्याचे सांगण्यात आले. आंदोलनादरम्यान कॉकरोच जनता पार्टीचा (सीजेपी) संस्थापक अभिजित दीपके याचा ब्रेड पकोडे, नूडल्स आणि कचोरी खातानाचा एक व्हिडिओ व्हायरल झाला आहे. यावर प्रतिक्रिया देताना दीपके याने हा व्हिडिओ चुकीच्या संदर्भात प्रसारित करण्यात आल्याचा दावा केला.

# कॅबिनेट बैठक सोडून एकनाथ शिंदे शरद पवारांच्या भेटीला! चर्चांना उधाण

■ मुंबई

**राज्य** विधिमंडळाच्या पावसाळी अधिवेशनादरम्यान आज उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांनी राष्ट्रवादी काँग्रेसचे अध्यक्ष शरद पवार यांची विधान भवनात भेट घेतली. आज राज्य मंत्रिमंडळाची बैठक सुरू असतानाच एकनाथ शिंदे हे शरद पवार यांच्या कार्यालयात पोहोचले. दोन्ही नेत्यांमध्ये काही काळ चर्चा झाली. त्यानंतर शिंदे पुन्हा कॅबिनेट बैठकीसाठी रवाना झाले. या भेटीनंतर राजकीय वर्तुळात विविध चर्चांना उधाण आले आहे. मात्र, शिंदे यांच्या कार्यालयाने ही सदिच्छा भेट असल्याचे सांगितले.

एकनाथ शिंदे हे गेल्या



काही दिवसांपासून आजारी होते. ठाण्यातील ज्युपिटर हॉस्पिटलमध्ये त्यांच्यावर उपचार सुरू होते. आजारपणावर मात करून ते आज विधान भवनात दाखल झाले. विशेष म्हणजे, शरद पवार यांनी पक्षातील सर्व आमदारांची बैठक ही उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांच्या कार्यालयात बोलावली होती. या बैठकीला जयंत पाटील, जितेंद्र आव्हाड, उत्तम जानकर, रोहित पाटील, अभिजित पाटील यांच्यासह पक्षाचे अनेक आमदार उपस्थित होते. या बैठकीत पवार यांनी आमदारांना विविध राजकीय आणि संघटनात्मक विषयांवर मार्गदर्शन केल्याची माहिती आहे. याचवेळी विधान भवनात मुख्यमंत्री फडणवीस यांच्या अध्यक्षतेखाली महाराष्ट्र-कर्नाटक सीमा प्रश्नासंदर्भातील उच्चाधिकार समितीची बैठकही पार पडली.

# छोट्या जाहिराती

**संपर्क करा**
**८४२२८१७४४५/८१०८११६४२३**

### पाहिजेत

२.५ वर्षाच्या बाळाला घरी सांभाळण्यासाठी मुलगी/बाई पाहिजे ग्रँटरोड **9867755709** {NC261187}

१ ते २४ तास घरकाम करण्यासाठी मुली व बायका पाहिजेत **8369637847, 8291432127** {NC261184}

खार येथील कुरीअर ऑफीससाठी कॉम्प्युटर ऑपरेटरची आवश्यकता आहे संपर्क **9930011100** {NC261185}

हायकोर्ट कॅन्टीनसाठी तातडीने स्टाफ हवा आहे. अनुभवी तसेच फ्रेश उमेदवारांनी संपर्क साधावा. रिक्त पदेः * किचन कूक-२, * वेटर/ पार्सल डिलीव्हरी-२, *हाऊसकीपिंग-१ आकर्षक पगार प्रथम येणाऱ्यास प्राधान्य संपर्कः **7776088460, 8999578799** {NC261186}

दादरस्थित आस्थापनेला अनुभवी ड्रायव्हर हवा आहे. जवळपास राहणाऱ्यांना प्राधान्य. संपर्कः **022 46003566/ 5056.** anandlimaye55@gmail.com {NC261183}

### Situation Vacant

Need office girl for back office/ admin staff work in santacruz west Contact **9987976412** {NC261161}

### शैक्षणिक

प्रोफेशनल सिव्हिल आर्किटेक्चर ड्राफ्टसमन आणि मेकॅनिकल ड्राफ्टसमन कोर्सेस. शिवाय दहावी, बारावी टेक्निकल फेलसाठी टेक्निकल ड्रॉईंग आणि टेक्निकल डिप्लोमा फेलसाठी इंजिनियरिंग ड्रॉईंग. गुप्ते अकॅडमी, दादर. **7506465793/ 9757312624** चौकशी सकाळी ८.३० ते दुपारी ३.३० {NC261140}

हमखास पासाची गॅरंटी खर्डीकर क्लासेस. ७वी नापास? डायरेक्ट १०वी. ११वी नापास? डायरेक्ट १२वी. डोंबिवली: **9820627580 / 9820904646** {NC261156}

### व्यवसायविषयक

महिला/ मुलींना फक्त ६ महिन्यात 10,00,000/- कमवून देणारे जीवन विमा मार्गदर्शन- **9373956687/ 9326367944** {NC261097}



**वाचकांना सूचना**

दैनिक 'नवाकाळ' वर्तमानपत्रात प्रसिद्ध झालेल्या जाहिरातींच्या सत्यतेबाबत दैनिक 'नवाकाळ'ची कोणतीही जबाबदारी नाही. वाचकांनी स्वतः पडताळणी करून स्वतःच्या जबाबदारीने निर्णय घ्यायचा आहे, याची नोंद घ्यावी. - **मॅनेजर, 'नवाकाळ'**


# झारखंडमध्ये आंतरजातीय विवाह मुलीचे जिवंतपणी अंत्यसंस्कार

■ रांची

**झारखंडमधील** चतरा जिल्ह्यात आंतरजातीय विवाह केल्यामुळे एका २१ वर्षीय तरुणीच्या कुटुंबाने तिचे प्रतीकात्मक अंत्यसंस्कार केले. कुटुंबाच्या इच्छेविरुद्ध जाऊन विवाह केल्याच्या रागातून मुलीचा पुतळा तयार करून त्याची अंत्ययात्रा काढण्यात आली. त्यानंतर पुतळ्याचे दहन करण्यात आले. श्राद्ध व पिंडदानाचे विधीही पार पाडण्यात आले.



संबंधित तरुणी ब्राह्मण समाजातील असून, तिने दांगी (कुशवाहा- ओबीसी) समाजातील एका अग्निवीर जवानासोबत विवाह केला. या विवाहाला मुलीच्या कुटुंबाचा विरोध होता. दोघांनीही स्वतःच्या इच्छेने विवाह केल्यानंतर मुलाच्या कुटुंबाने या नात्याचा स्वीकार केला आहे. मात्र, विवाहानंतर त्यांना अप्रत्यक्ष धमक्या मिळत असल्याचा आरोप त्यांनी केला आहे.

गिधौर पोलीस ठाण्याचे प्रभारी पुरुषोत्तम अग्निहोत्री यांनी सांगितले की, सुरुवातीला मुलीच्या कुटुंबियांनी तिला पळवून नेल्याची तक्रार पोलिसांकडे केली होती. मात्र, तरुणीने स्वखुशीने विवाह केल्याचे सांगितले.

तरुणीने आपल्या कुटुंबाकडून त्रास दिला जात असल्याचे म्हटले आहे. तो सुरू राहिल्यास वरिष्ठ पोलीस अधिकाऱ्यांकडे तक्रार करणार असल्याचे म्हटले आहे.

**देश विदेश**

# फ्रान्स राष्ट्राध्यक्षपदाची निवडणूक लढवण्याची मरीन यांना परवानगी

■ पॅरिस



**पॅरिसमधील** न्यायालयाने अतिउजव्या विचारसरणीच्या नेत्या मरीन ले पेन यांना २०२७ च्या राष्ट्राध्यक्षपदाच्या निवडणुकीत लढण्याची परवानगी दिली आहे. युरोपीय संसदेच्या निधीचा गैरवापर केल्याच्या आरोपाखाली त्यांची शिक्षा कमी केली नसली तरी न्यायालयाने त्यांचे निवडणूक लढवण्यावरील निर्बंध शिथिल केले. निवडणुकीपूर्वीच त्यांची अपात्रतेची मुदत संपणार असल्याने त्या तांत्रिकदृष्ट्या निवडणूक लढवण्यास पात्र ठरल्या आहेत.

न्यायालयाने मरीन यांची सार्वजनिक पदावर राहण्यासाठीची बंदी १५ महिन्यांपर्यंत कमी केली. त्यांना ३ वर्षांच्या तुरुंगवासाची शिक्षा (२ वर्षे निलंबित) ठोठावली असून त्यांना १ वर्ष इलेक्ट्रॉनिक टॅग बाळगण्यास सांगितले आहे. मात्र मरीन ले पेन यांनी इलेक्ट्रॉनिक टॅग घालून प्रचार करणे अशक्य होईल, अशी भूमिका यापूर्वी घेतली होती. त्यामुळे त्या स्वतः निवडणुकीच्या रिंगणात उतरतील की, आपल्याऐवजी पक्षाचे तरुण नेते जॉर्डन बार्डेला यांना उमेदवारी देतील, यावर अंतिम निर्णय अवलंबून आहे.

# ३७ वर्षे शिक्षा भोगल्यानंतर साईबन्ना यांची तुरुंगातून सुटका

■ बंगळुरु

**कर्नाटकातील** कलबुर्गी येथील मूळ रहिवासी असलेले ७२ वर्षीय साईबन्ना निनगप्पा नाटीकर यांची तब्बल ३७ वर्षे तुरुंगवास भोगल्यानंतर बंगळुरूच्या परप्पना अग्रहारा मध्यवर्ती कारागृहातून सुटका करण्यात आली. राज्य सरकारच्या चांगल्या आचरण आणि पुनर्वसन धोरणांतर्गत इतर २३ जन्मठेपेच्या कैद्यांसह त्यांची मुक्तता करण्यात आली. १९८८ मध्ये त्यांनी पहिल्या पत्नीची हत्या केली होती. त्यात त्यांना जन्मठेपेची शिक्षा ठोठावली. १९९४ मध्ये पॅरोल सुटल्यानंतर काही दिवसांतच दुसरे लग्नही केले. त्यांना एक मुलगीही झाली. काही आठवड्यांनंतर दुसऱ्या पत्नीवरही त्यांना संशय आला. या संशयातून त्यांनी पत्नी आणि लेकीचीही हत्या केली. याप्रकरणी २००३ मध्ये कनिष्ठ न्यायालयाने त्यांना फाशीची शिक्षा सुनावली होती, जी नंतर कर्नाटक उच्च न्यायालयाने जन्मठेपेत बदलली. १० वर्षे बेकायदेशीरपणे एकांतवासात ठेवल्याबद्दल आणि दयेच्या याचिकेवर प्रदीर्घ विलंब झाल्यामुळे त्यांच्या शिक्षेत सवलत देण्यात आली.

# चीनमध्ये माजी अधिकारी यांग योलिन यांना मृत्युदंड

**लाहोर-** पूर्व चीनमधील एका न्यायालयाने माजी शहर अधिकारी 'यांग योलिन' यांना ३० वर्षांच्या कालावधीत २.२ अब्ज युआनपेक्षा जास्त भ्रष्टाचार आणि लाच घेतल्याबद्दल फाशीची शिक्षा सुनावली. १९९३ ते २०२३ या ३ दशकांच्या काळात त्यांनी हे गुन्हे केले. ते पूर्व चीनमधील विकास विभागाचे माजी कार्यकारी उपसंचालक होते.



लाचखोरी व्यतिरिक्त, त्यांना गैरव्यवहार, पदाचा गैरवापर आणि मनी लाँड्रिंगसाठीही दोषी ठरवण्यात आले. या निकालामुळे त्यांच्या सर्व राजकीय अधिकारांवर कायमस्वरूपी बंदी घालण्यात आली असून, एक्सपोर्ट त्यांची सर्व वैयक्तिक मालमत्ता जप्त करण्यात आली आहे. ही कारवाई चीनचे राष्ट्राध्यक्ष शी जिनपिंग यांच्या प्रदीर्घ भ्रष्टाचारविरोधी मोहिमेचा एक भाग आहे. गुन्हा अत्यंत गंभीर स्वरूपाचा असल्यामुळे दोषींनी गुन्ह्याची कबुली देऊनही त्यांना कोणताही दयेचा लाभ देण्यात आला नाही.

# नवी मुंबई विमानतळ नामकरणासाठी मोर्चा

पनवेल- नवी मुंबई आंतरराष्ट्रीय विमानतळाला लोकनेते दि. बा. पाटील यांचे नाव देण्यात यावे, या मागणीसाठी आज पनवेलमध्ये काढण्यात आलेल्या मोर्चादरम्यान पोलिसांनी अनेक आंदोलकांना ताब्यात घेतले. या कारवाईत शरद पवार गटाचे खासदार बाळ्यामामा म्हात्रे यांनाही पोलिसांनी ताब्यात घेतले. पनवेल शहरातील छत्रपती शिवाजी महाराज चौकातून मोर्चाला सुरुवात होणार होती. सकाळी १० वाजल्यापासून आंदोलक मोठ्या संख्येने येथे जमा होऊ लागले.

# शेतकरी कर्जमाफीवरील बैठक रद्द! रोहित पवारांचा सरकारवर हल्लाबोल

■ मुंबई

**शेतकरी** कर्जमाफीसंदर्भात शरद पवार गटाचे आमदार रोहित पवार यांनी यांनी उपोषण केल्यानंतर नियुक्त करण्यात आलेल्या समितीचे प्रमुख प्रवीणसिंह परदेशी यांच्यासोबत आज सकाळी आयोजित करण्यात आली होती. पण ही बैठक ऐनवेळी रद्द करण्यात आल्याने रोहित पवार संतापले. त्यांनी सरकारने शेतकऱ्यांची घोर थट्टा चालवली आहे अशी एक्स पोस्ट करत टीका केली.

शेतकऱ्यांच्या विनाअट सरसकट कर्जमाफीच्या मागणीवर चर्चा करण्यासाठी आज सकाळी १०.३० वाजता बैठक आयोजित करण्यात आली होती. मात्र शिष्टमंडळ आणि संबंधित नेते वेळेत उपस्थित असतानाच फोनवरून बैठक रद्द करण्यात आली. याबाबत रोहित पावर म्हणाले की, बैठकीसाठी आम्ही सर्वजण वेळेत उपस्थित होतो. एकही वरिष्ठ अधिकारी उपस्थित राहिला नाही. त्यानंतर ऐनवेळी फोनवरून बैठक रद्द झाल्याचे सांगण्यात आले. हा केवळ आमच्या शिष्टमंडळाचा अवमान नाही तर राज्यातील तमाम शेतकऱ्यांची सरकारने चालवलेली ही घोर थट्टा आहे. सरकारच्या आदेशाशिवाय कोणताही अधिकारी अशी हिंमत करू शकत नाही. शेतकरी कर्जमाफीसारख्या महत्त्वाच्या विषयावर सरकारची ही भूमिका अत्यंत संतापजनक आहे. अधिकाऱ्यांच्या रिकाम्या खुर्च्यांशी मूक संवाद साधण्याची वेळ आमच्यावर आली. शेतकऱ्यांनीही या प्रश्नासाठी संघर्षात सहभागी व्हावे.

# पाणी ओसरेना! वीजही गायब नालासोपाऱ्यात संतप्त नागरिक रस्त्यावर

■ वसई

**वसई-विरार** शहरात पावसाचा जोर काहीसा कमी झाला असला, तरी पूरस्थिती अद्याप कायम आहे. अनेक भागांतील पाणी अद्याप ओसरलेले नाही, तर काही भागांत तब्बल ७२ तासांहून अधिक काळ वीजपुरवठा खंडित असल्याने नागरिकांचे हाल सुरू आहेत. या पार्श्वभूमीवर बुधवारी नालासोपाऱ्यात संतप्त नागरिक रस्त्यावर उतरले आणि घोषणाबाजी करत प्रशासनाविरोधात तीव्र संताप व्यक्त केला.

जुलै महिन्यात अवघ्या सात दिवसांत तब्बल १,४८२ मिलिमीटर पावसाची नोंद झाली आहे. अतिवृष्टीमुळे शहरातील अनेक सखल भाग जलमय झाले असून गेल्या चार दिवसांपासून अनेक वस्त्या पुराच्या पाण्याने वेढलेल्या आहेत. पुराच्या पाण्यात महावितरणची मुख्य उपकेंद्रे, अनेक रोहित्रे, वीज वितरण पेट्या आणि भूमिगत केबल्स पाण्याखाली गेल्याने शहरातील अनेक भागांचा वीजपुरवठा खंडित झाला आहे. नालासोपारा येथील छेडा नगर, पाटणकर पार्क, यशवंत गौरव, हनुमान नगर, साई धाम, चंदन नाका, अलकापुरी, अग्रवाल नगरी या भागात ७२ तासांहून अधिक काळ वीज नसल्याने नागरिकांना अंधारात रात्र काढावी लागत आहे. वीज नसल्याने पिण्याच्या पाण्याचाही गंभीर प्रश्न निर्माण झाला असून मोबाईल चार्जिंगपासून दैनंदिन गरजांपर्यंत सर्वच कामांवर परिणाम झाला आहे. या पार्श्वभूमीवर बुधवारी सकाळी नालासोपाऱ्यातील नगिनदासपाडा परिसरातील हजारो नागरिक रस्त्यावर उतरले. त्यांनी रस्ता अडवून प्रशासन आणि महावितरणविरोधात घोषणाबाजी केली. गेल्या चार दिवसांपासून वीज नाही. लहान मुलांचे प्रचंड हाल होत आहेत. गेल्या २५ वर्षांत अशी परिस्थिती कधीच पाहिली नव्हती. दैनंदिन वापरासाठीही पाणी उपलब्ध नाही. नगरसेवक केवळ मत मागण्यासाठी येतात, त्यानंतर नागरिकांकडे फिरकतही नाहीत, असा आरोप स्थानिकांनी केला. दरम्यान नालासोपार्यात आज नाल्यात पडून एका तरुणीचा मृत्यू झाला. कविता जैस्वाल (२२) असे या तरुणीचे नाव असून ती मूळची उत्तर प्रदेशातील जौनपूर येथील राहणारी होती. पोलिसांनी दिलेल्या माहितीनुसार, कविता आपल्या भावासह नालासोपारा येथे राहणार्या बहिणीला भेटायला आली होती. आज दुपारी दिडच्या सुमारास ती बहीण रेणुकुमारी आणि भावासह ती रिचर्ड कंपाऊंड येथील नाल्याजवळून जात होती. अचानक तोल जाऊरे रेणुकुमारी पाण्यात पडली. तिला वाचवायला कवितादेखील पाण्यात उतरली. स्थानिकांनी दोघांना वाचविण्याचा प्रयत्न केला. मात्र रेणुकुमारीला सुखरूप बाहेर काढण्यात आले तर कविताचा बुडून मृत्यू झाला.

# दिव्यांग शाळांच्या नूतनीकरणाला ६० दिवसांची मुदत

■ मुंबई

**दिव्यांग** शाळांच्या ऑनलाईन नूतनीकरण प्रक्रियेला गती देण्यासाठी अर्ज प्राप्त झाल्यानंतर ६० दिवसांच्या आत नूतनीकरणाची प्रक्रिया पूर्ण करण्याचे निर्देश देण्यात आल्याची माहिती मंत्री अतुल सावे यांनी आज विधान परिषदेत दिली. दिव्यांग शाळांचे प्रश्न सोडवण्यासाठी सरकार सकारात्मक असून, शिक्षकांच्या वेतनासह प्रलंबित मागण्या प्राधान्याने मार्गी लावण्यात येत असल्याचेही सावे यांनी स्पष्ट केले.

**सावेंची माहिती**

विधान परिषदेतील प्रश्नोत्तराच्या तासात आमदार सुधाकर अडबाले यांनी दिव्यांग शाळांच्या नोंदणी प्रक्रियेतील अडचणी आणि कर्मचाऱ्यांच्या वेतनाच्या प्रश्नाकडे सरकारचे लक्ष वेधले.

अडबाले यांनी सांगितले की, २००४ पासून दिव्यांग विद्यार्थ्यांना शिक्षण देणाऱ्या शाळांना दरवर्षी नोंदणी नूतनीकरण प्रक्रियेतून जावे लागते. मात्र 'महाराष्ट्र दिव्यांग साहाय्यक पोर्टल' आणि ई-फाईलमधील तांत्रिक त्रुटींमुळे संस्थाचालकांना अडचणींचा सामना करावा लागतो. ऑनलाईन प्रक्रियेत अडथळे आल्याने अनेकदा ऑफलाइन कागदपत्रांसह कार्यालयात फेऱ्या माराव्या लागतात.

# आजचे राशी भविष्य

गुरुवार ता. ९ जुलै २०२६
ज्योतिष पंडीत अर्चना तारु

| राशी | भविष्य |
|---|---|
| मेष | मनावरील ताण कमी होईल. गृहसौख्य चांगले राहील. नवीन कला जोपासण्यासाठी वेळ द्याल. |
| वृषभ | महत्त्वाच्या कामात अचानक अडचणी उद्भवू शकतात. बोलण्यातून गैरसमज निर्माण होण्याची शक्यता. चीजवस्तू जपा. |
| मिथुन | खर्चाचे प्रमाण वाढेल. सरकारी कामांमध्ये नियमांचे पालन करावे लागेल. भावंडांचे सौख्य लाभेल. |
| कर्क | आर्थिक स्थिती चांगली राहील. नोकरीत तुमच्या कामाची दखल घेतली जाईल. कुटुंबीयांबरोबर छोट्या सहलीचे आयोजन कराल . |
| सिंह | मनात सकारात्मक विचार राहतील. भाग्याची साथ लाभेल. मित्रमंडळींच्या भेटीने आनंद होईल. |
| कन्या | आर्थिक नुकसानीची शक्यता. कोणतेही काम घाईघाईने उरकू नका. वाहने जपून चालवा. |
| तूळ | वैवाहिक जीवनात गोडवा राहील. भेटवस्तू मिळतील. सामाजिक कार्यात पुढाकार घ्याल. |
| वृश्चिक | नोकरीच्या प्रयत्नांना यश मिळेल. विरोधकांच्या कारवाया सुरू राहतील. वडिलधाऱ्यांचा आशीर्वाद लाभेल. |
| धनु | आर्थिक व्यवहार तूर्तास पुढे ढकलले जातील. संततीशी सुसंवाद साधा. आरोग्य सांभाळा. |
| मकर | वास्तुसंबंधित कामांमध्ये अनेक अडचणी येतील. सरकारी नियमांचे पालन आवश्यक. भावंडांची मदत होईल. |
| कुंभ | आर्थिक गुंतवणूक करण्याची घाई करू नका. तुमच्या योजना उघडपणे बोलू नका. सहकारी तुमच्या मताचा मान राखतील. |
| मीन | घरात आनंदाचे वातावरण राहील. एखाद्या धार्मिक स्थळी भेट द्याल. नोकरीसाठी अधिक प्रयत्न करावे लागतील. |

# लॉटरी

## महाराष्ट्र अक्षय विकली लॉटरी

सोडत दर बुधवारी | तिकीट किंमत रु. 50/- | सोडत क्र. 27 | सोडत दिनांक 08/07/2026

पहिले सामाईक बक्षिस रु. 7 लाख — **AK-08 : 7054** — अंबिका एजन्सी - दादर, मुंबई

प्रोत्साहनपर बक्षिस रु. 2500/- — 7054

FOLLOWING NO.'S ARE COMMON TO ALL SERIES

दुसरे बक्षिस रु. 7000/- — **7187**

तिसरे बक्षिस रु. 5000/- — **1346** — किशोर लॉटरी सेंटर, सांगली

| बक्षिस | | | | | | | | | | |
|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|
| चौथे बक्षिस रु. 2000/- | 1161 | 1600 | 2484 | 4053 | 4217 | 4535 | 5080 | 5248 | 5953 | 6831 |
| पाचवे बक्षिस रु. 500/- | 1819 | 2679 | 3411 | 3449 | 3470 | 3856 | 4085 | 4730 | 5441 | 6724 |
| सहावे बक्षिस रु. 200/- | 1093 | 1431 | 1578 | 2584 | 3431 | 3520 | 4717 | 5018 | 7297 | 7641 |

सातवे बक्षीस रु. 110/- (सर्व मालिकांसाठी)

| | | | | | | | | | | | | | |
|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|
| 1015 | 1503 | 1972 | 2280 | 2826 | 3386 | 4004 | 4412 | 4856 | 5384 | 5945 | 6548 | 6981 | 7670 |
| 1102 | 1519 | 1973 | 2282 | 2882 | 3387 | 4014 | 4424 | 4880 | 5409 | 5954 | 6578 | 6996 | 7707 |
| 1107 | 1555 | 1981 | 2299 | 2924 | 3398 | 4016 | 4437 | 4896 | 5412 | 5970 | 6617 | 7000 | 7710 |
| 1117 | 1580 | 2003 | 2309 | 2928 | 3399 | 4017 | 4456 | 4904 | 5445 | 5989 | 6626 | 7062 | 7711 |
| 1122 | 1604 | 2009 | 2325 | 2969 | 3412 | 4043 | 4462 | 4918 | 5446 | 6034 | 6629 | 7081 | 7717 |
| 1141 | 1620 | 2026 | 2328 | 2982 | 3420 | 4048 | 4468 | 4969 | 5451 | 6083 | 6635 | 7147 | 7721 |
| 1148 | 1628 | 2028 | 2347 | 2992 | 3423 | 4060 | 4478 | 4976 | 5454 | 6086 | 6648 | 7174 | 7738 |
| 1156 | 1689 | 2045 | 2357 | 2994 | 3485 | 4070 | 4480 | 4984 | 5457 | 6154 | 6658 | 7175 | 7741 |
| 1164 | 1691 | 2074 | 2366 | 3038 | 3513 | 4080 | 4485 | 4989 | 5468 | 6194 | 6659 | 7181 | 7743 |
| 1173 | 1701 | 2089 | 2372 | 3059 | 3548 | 4105 | 4508 | 5003 | 5491 | 6226 | 6675 | 7210 | 7747 |
| 1176 | 1710 | 2110 | 2440 | 3086 | 3549 | 4116 | 4535 | 5007 | 5528 | 6230 | 6676 | 7218 | 7769 |
| 1191 | 1712 | 2127 | 2476 | 3098 | 3557 | 4140 | 4540 | 5014 | 5554 | 6270 | 6678 | 7258 | 7783 |
| 1213 | 1713 | 2143 | 2478 | 3163 | 3583 | 4146 | 4573 | 5104 | 5587 | 6281 | 6682 | 7288 | 7789 |
| 1215 | 1715 | 2182 | 2532 | 3168 | 3593 | 4157 | 4583 | 5135 | 5628 | 6337 | 6685 | 7297 | 7790 |
| 1229 | 1720 | 2194 | 2536 | 3203 | 3607 | 4171 | 4640 | 5160 | 5688 | 6356 | 6727 | 7329 | 7851 |
| 1248 | 1752 | 2205 | 2550 | 3205 | 3610 | 4187 | 4647 | 5165 | 5745 | 6361 | 6772 | 7378 | 7859 |
| 1274 | 1753 | 2209 | 2568 | 3209 | 3614 | 4204 | 4660 | 5168 | 5752 | 6367 | 6776 | 7396 | 7866 |
| 1289 | 1818 | 2228 | 2578 | 3283 | 3684 | 4211 | 4662 | 5175 | 5755 | 6383 | 6782 | 7397 | 7882 |
| 1318 | 1819 | 2232 | 2579 | 3294 | 3708 | 4267 | 4685 | 5200 | 5759 | 6398 | 6798 | 7403 | 7915 |
| 1332 | 1890 | 2235 | 2585 | 3306 | 3780 | 4289 | 4748 | 5204 | 5778 | 6442 | 6830 | 7440 | 7918 |
| 1341 | 1891 | 2237 | 2593 | 3337 | 3820 | 4334 | 4755 | 5229 | 5789 | 6473 | 6862 | 7450 | 7928 |
| 1356 | 1898 | 2245 | 2623 | 3340 | 3830 | 4370 | 4797 | 5256 | 5833 | 6489 | 6868 | 7516 | 7979 |
| 1412 | 1911 | 2247 | 2655 | 3342 | 3934 | 4394 | 4804 | 5257 | 5850 | 6490 | 6890 | 7532 | 7980 |
| 1416 | 1916 | 2273 | 2783 | 3347 | 3978 | 4397 | 4842 | 5274 | 5856 | 6517 | 6928 | 7546 | 7989 |
| 1487 | 1950 | 2276 | 2822 | 3356 | 3989 | 4407 | 4845 | 5342 | 5885 | 6521 | 6976 | 7573 | 7997 |

छपाईतील कोणत्याही चुकीबद्दल आम्ही जबाबदार नाही. अचूक निकालासाठी अधिकृत गॅझेट पहावे. प्रस्तुतकर्ताः महाराष्ट्र राज्य लॉटरी

## गणेशलक्ष्मी विजयी विकली लॉटरी

सोडत सायं. 5:00 वाजता | सोडत दर बुधवार • सोडत क्रमांक 27 • तिकीट किं. रु. 10/- • सोडत दिनांक 08/07/2026

पहिले सामाईक बक्षिस रु. 10000/- — **MG-06 : 0025**

FOLLOWING NO.'S ARE COMMON TO ALL SERIES

दुसरे बक्षिस रु. 7000/- — **1083**

तिसरे बक्षिस रु. 5000/- — **1639**

चौथे बक्षिस रु. 2000/- — **7850** — अंबिका एजन्सी, दादर, मुंबई

| बक्षिस | | | | | | | | | | |
|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|
| पाचवे बक्षिस रु. 500/- | 1316 | 1811 | 1849 | 1900 | 2538 | 4554 | 4610 | 6231 | 7398 | 7485 |
| सहावे बक्षिस रु. 200/- | 0179 | 0992 | 1088 | 2068 | 2123 | 3330 | 5656 | 6171 | 6295 | 8307 |

सातवे बक्षीस रु. 150/- (सर्व मालिकांसाठी)

| | | | | | | | | | | |
|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|
| | | 2036 | 2411 | 3232 | 4422 | 5302 | 6446 | 7350 | 8113 | 8890 |
| | | 2052 | 2422 | 3323 | 4433 | 5378 | 6466 | 7386 | 8210 | 8923 |
| | | 2124 | 2532 | 3370 | 4483 | 5593 | 6488 | 7388 | 8286 | 9081 |
| 0002 | 1014 | 2140 | 2632 | 3453 | 4514 | 5654 | 6499 | 7470 | 8369 | 9104 |
| 0089 | 1036 | 2182 | 2738 | 3531 | 4543 | 5774 | 6662 | 7481 | 8450 | 9164 |
| 0145 | 1135 | 2201 | 2742 | 3533 | 4611 | 5853 | 6677 | 7501 | 8573 | 9197 |
| 0209 | 1170 | 2202 | 2752 | 3733 | 4614 | 5886 | 6895 | 7607 | 8649 | 9219 |
| 0250 | 1173 | 2203 | 2832 | 3742 | 4661 | 5955 | 6970 | 7724 | 8680 | 9223 |
| 0274 | 1184 | 2212 | 2852 | 3893 | 4699 | 6025 | 6996 | 7726 | 8694 | 9362 |
| 0308 | 1187 | 2232 | 2923 | 4007 | 4714 | 6116 | 7072 | 7743 | 8717 | 9477 |
| 0559 | 1271 | 2246 | 2965 | 4048 | 4804 | 6250 | 7077 | 7746 | 8807 | 9660 |
| 0578 | 1276 | 2292 | 3067 | 4217 | 4905 | 6266 | 7099 | 7753 | 8814 | 9770 |
| 0713 | 1451 | 2296 | 3090 | 4230 | 4982 | 6270 | 7182 | 7778 | 8836 | 9819 |
| 0844 | 1563 | 2325 | 3092 | 4243 | 4986 | 6284 | 7200 | 7824 | 8842 | 9879 |
| 0967 | 1815 | 2341 | 3136 | 4344 | 5237 | 6288 | 7210 | 7889 | 8846 | 9936 |
| 1013 | 1881 | 2372 | 3211 | 4364 | 5290 | 6396 | 7297 | 7940 | 8885 | 9966 |

छपाईतील कोणत्याही चुकीबद्दल आम्ही जबाबदार नाही. अचूक निकालासाठी अधिकृत गॅझेट पहावे. प्रस्तुतकर्ताः महाराष्ट्र राज्य लॉटरी

## महाराष्ट्र गजलक्ष्मी बुध विकली लॉटरी

सोडत सायं. 4:45 वाजता | सोडत दर बुधवार • सोडत क्रमांक 27 • तिकीट किं. रु. 20/- • सोडत दिनांक 08/07/2026

पहिले बक्षिस रु. 10,000/- — **GL-00 : 2470**

FOLLOWING NO.'S ARE COMMON TO ALL SERIES

दुसरे बक्षिस रु. 5000/- — **2912**

तिसरे बक्षिस रु. 2000/- — **5412** — श्री अष्टविनायक लॉटरी, औरंगाबाद

| बक्षिस | | | | | | | | | | |
|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|
| चौथे बक्षिस रु. 1000/- | 1183 | 1242 | 2258 | 2487 | 4496 | 4514 | 4574 | 4731 | 4987 | 5037 |
| पाचवे बक्षिस रु. 500/- | 1936 | 3009 | 4011 | 4288 | 4479 | 4517 | 5181 | 5238 | 5338 | 5826 |

सहावे बक्षीस रु. 250/- (सर्व मालिकांसाठी)

| | | | | | | | | | |
|---|---|---|---|---|---|---|---|---|---|
| 1008 | 1137 | 1394 | 1936 | 2245 | 2652 | 3349 | 4074 | 4648 | 5360 |
| 1056 | 1139 | 1468 | 1941 | 2267 | 2702 | 3350 | 4111 | 4713 | 5440 |
| 1079 | 1147 | 1471 | 1953 | 2270 | 2727 | 3356 | 4142 | 4785 | 5495 |
| 1091 | 1169 | 1511 | 2020 | 2277 | 2911 | 3393 | 4317 | 4965 | 5576 |
| 1104 | 1187 | 1519 | 2023 | 2312 | 3030 | 3730 | 4354 | 4994 | 5581 |
| 1107 | 1197 | 1642 | 2158 | 2313 | 3050 | 3777 | 4414 | 5007 | 5624 |
| 1109 | 1219 | 1649 | 2212 | 2451 | 3096 | 3830 | 4465 | 5049 | 5640 |
| 1116 | 1248 | 1781 | 2226 | 2562 | 3193 | 3929 | 4543 | 5050 | 5753 |
| 1117 | 1252 | 1791 | 2239 | 2601 | 3302 | 3938 | 4553 | 5227 | 5821 |
| 1118 | 1360 | 1893 | 2241 | 2625 | 3327 | 3997 | 4582 | 5295 | 5902 |

छपाईतील कोणत्याही चुकीबद्दल आम्ही जबाबदार नाही. अचूक निकालासाठी अधिकृत गॅझेट पहावे. प्रस्तुतकर्ताः महाराष्ट्र राज्य लॉटरी

## महाराष्ट्र सह्याद्री • विजयालक्ष्मी विकली लॉटरी •

सोडत सायं. 4:30 वाजता | सोडत दर बुधवार • सोडत क्रमांक 27 • तिकीट किं. रु. 30/- • सोडत दिनांक 08/07/2026

पहिले सामाईक बक्षिस रु. 10000/- — **SV-06 : 2559** — महावीर लॉटरी सेंटर, कोल्हापूर

FOLLOWING NO.'S ARE COMMON TO ALL SERIES

दुसरे बक्षिस रु. 5000/- — **4078**

| बक्षिस | | | | | | | | | | |
|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|
| तिसरे बक्षिस रु. 2000/- | 1765 | 1923 | 2432 | 3279 | 3606 | 3657 | 4850 | 5324 | 5663 | 5763 |
| चौथे बक्षिस रु. 1000/- | 1115 | 2005 | 2367 | 3143 | 3220 | 3747 | 3812 | 4055 | 4628 | 5769 |
| पाचवे बक्षिस रु. 500/- | 1337 | 2038 | 2937 | 2977 | 3096 | 3491 | 3905 | 4963 | 5365 | 5857 |

सहावे बक्षीस रु. 300/- (सर्व मालिकांसाठी)

| | | | | | | | |
|---|---|---|---|---|---|---|---|
| | | 2216 | 2887 | 3384 | 4114 | 4619 | 5427 |
| | | 2232 | 2892 | 3388 | 4118 | 4784 | 5466 |
| 1001 | 1638 | 2322 | 2897 | 3583 | 4144 | 4840 | 5493 |
| 1017 | 1700 | 2359 | 2912 | 3658 | 4277 | 4854 | 5524 |
| 1018 | 1735 | 2473 | 2917 | 3683 | 4413 | 4868 | 5570 |
| 1028 | 1740 | 2514 | 2947 | 3703 | 4428 | 4946 | 5580 |
| 1095 | 1808 | 2535 | 3000 | 3752 | 4429 | 4974 | 5590 |
| 1217 | 1841 | 2577 | 3131 | 3833 | 4483 | 5064 | 5650 |
| 1286 | 1846 | 2582 | 3175 | 3979 | 4488 | 5105 | 5666 |
| 1331 | 1917 | 2675 | 3311 | 4019 | 4498 | 5123 | 5756 |
| 1591 | 1970 | 2723 | 3319 | 4073 | 4529 | 5207 | 5774 |
| 1613 | 2063 | 2724 | 3334 | 4099 | 4548 | 5253 | 5909 |
| 1631 | 2076 | 2778 | 3340 | 4110 | 4571 | 5420 | 5965 |

छपाईतील कोणत्याही चुकीबद्दल आम्ही जबाबदार नाही. अचूक निकालासाठी अधिकृत गॅझेट पहावे. प्रस्तुतकर्ताः महाराष्ट्र राज्य लॉटरी

## शुभ राशी ता. ९/७/२०२६

| | | |
|---|---|---|
| ० | ५ | ३ |
| ०४ | ५४ | ३४ |
| ०९ | ५९ | ३९ |
| १९० | १४० | १४८ |
| ५७८ | २३० | २३८ |

# राजनाथ सिंह यांची राजकारणातून निवृत्ती?

» पान १ वरून

तरुण असेल. सरासरी वय भाजपा अध्यक्षांच्या वयाच्या आसपास म्हणजे ४६ वर्षे असेल. परंतु ६५ वर्षांपेक्षा जास्त वयाच्या लोकांना बाहेर जावेच लागेल. काही जणांचा अपवादच केला जाईल. त्यामुळे हा नियम पंतप्रधान पदासाठी लागू होणार नाही. याशिवाय इतर पक्षांमधून फुटून एनडीत आलेल्या खासदारांना मंत्रिमंडळात स्थान दिले जाणार आहे. यात पंजाबमधून फुटून भाजपात आलेले आम आदमी पक्षाचे राज्यसभा खासदार, उबाठामधून फुटून शिंदे गटात आलेले लोकसभेचे खासदार आणि पश्चिम बंगालमधील तृणमूल काँग्रेसच्या खासदारांचा समावेश आहे.

## पाच मंत्र्यांना फटका

» पान १ वरून

नवीन निर्णय घ्यायचे असल्याने नवीन चेहरा हवा आहे. सितारामन यांच्यावर दक्षिणेचे प्रभारी म्हणून जबाबदारी सोपवली जाईल. त्यांची जागा शक्तिकांत दास येऊ शकतात. सध्या ते पंतप्रधानांचे प्रधान सचिव आहेत. अर्थमंत्री म्हणून वाणिज्य आणि उद्योग मंत्री पीयूष गोयल यांच्या नावाचीही चर्चा आहे. पंकज चौधरी केंद्रीय अर्थ राज्यमंत्री आणि उत्तर प्रदेश भाजपाचे प्रदेशाध्यक्ष आहेत. भाजपामध्ये दोन पदांचे धोरण नाही. तसेच नवीन लोकांना पद देण्यासाठी जागाही हवी असल्याने पंकज प्रदेशाध्यक्षपदी राहतील, पण त्यांना मंत्रिपद सोडावे लागेल. केंद्रीय रस्ते वाहतूक आणि महामार्ग मंत्रालय तसेच कॉर्पोरेट व्यवहार मंत्रालयाचे राज्यमंत्री हर्ष मल्होत्रा दिल्ली भाजपाचे अध्यक्ष आहेत. त्यांना एक पद सोडावे लागेल.

# जगणे सुखाचे नसेल, किमान मरण तरी सन्मानाचे करा! वडेट्टीवारांची मागणी

■ मुंबई

**मुंबई -** यवतमाळ जिल्ह्यातील मारेगाव तालुक्यात अनेक गावांमध्ये स्मशानभूमीची सुविधा नसल्याचा मुद्दा विधानसभेत उपस्थित करण्यात आला. यावरून काँग्रेस आमदार विजय वडेट्टीवार यांनी जगणे सुखाचे नसेल तरी किमान मरण तरी सन्मानाचे करा, अशी मागणी सरकारकडे केली. राज्यातील सुमारे २० टक्के गावांमध्ये अद्यापही



स्मशानभूमीची सुविधा उपलब्ध नसल्याचा गंभीर मुद्दा त्यांनी सभागृहात मांडला.

वडेट्टीवार यांनी जिल्हा नियोजन समितीच्या निधीपैकी ३ टक्के निधी स्मशानभूमी विकासासाठी राखीव ठेवण्याची मागणी केली. तसेच महसूल विभागाने शासकीय जमिनी स्मशानभूमीसाठी उपलब्ध करून देण्यासाठी स्वतंत्र शासन निर्णय काढावा, अशीही आग्रही मागणी त्यांनी केली.

यावर उत्तर देताना ग्रामविकास मंत्री जयकुमार गोरे म्हणाले की, मारेगाव तालुक्यातील परिस्थितीचा तपशील सभागृहासमोर मांडला. त्यांनी सांगितले की, तालुक्यातील उजाड गावे वगळता ९३ महसुली गावांपैकी ६१ गावांमध्ये स्मशानभूमीची सुविधा उपलब्ध आहे.

# कोकणासह विदर्भातील चार पारंपरिक कलांचा अनुदान योजनेत समावेश

■ मुंबई

**महाराष्ट्राच्या** समृद्ध लोककला परंपरेचे जतन आणि संवर्धन करण्यासाठी राज्य सरकारने लोककला अनुदान योजनेचा विस्तार करण्याचा निर्णय घेतला आहे. यापुढे नमन खेळे, जाखडी', वहीगायन आणि झाडीपट्टी या चार पारंपरिक लोककलांचा योजनेत समावेश करण्यात येणार असल्याची घोषणा आज सांस्कृतिक कार्यमंत्री ॲड. आशिष शेलार यांनी विधानसभेत केली. आमदार निलेश राणे यांनी लोककलाकारांच्या अडचणींकडे सभागृहाचे लक्ष वेधले. दशावतार कलाकारांना अद्याप योग्य सन्मान आणि अनुदान मिळत नसल्याचा मुद्दा त्यांनी उपस्थित केला. तसेच कलाकारांची नोंदणी, ओळखपत्र आणि योजना मिळण्यातील अडचणी दूर करण्याची मागणी केली.

यावर उत्तर देताना आशिष शेलार यांनी सांगितले की, लोककला पथकांना मिळणाऱ्या अनुदानात वाढ करण्याचा निर्णय घेण्यात आला आहे.

# गोकुळाष्टमीतील अश्लील नृत्यावर बंदी घाला! मनिषा कायंदेंची मागणी

■ मुंबई

**महाराष्ट्रात** सांस्कृतिक परवान्यांच्या नावाखाली बारमध्ये चालणाऱ्या अश्लील नृत्यांवर बंदी घालण्याची घोषणा काल सरकारने केली होती. मात्र, ही कारवाई करताना गोकुळाष्टमीसारख्या पवित्र सणासुदीला होणाऱ्या जाहीर अश्लील नृत्यावर आधी बंदी घाला. अशा कार्यक्रमांना जाण्यास लाज वाटते अशी कबुली विधान परिषदेत आमदार मनिषा कायंदे यांनी सभागृहात दिली.

महिलांच्या प्रतिष्ठेचे संरक्षण करण्यासंदर्भातील २०१६ च्या कायद्यात सुधारणा करणारे विधेयक आज विधान परिषदेत चर्चेला आले होते. हे विधेयक यापूर्वी विधानसभेत मंजूर झाले असून, त्यावर बोलताना विधान परिषदेच्या सदस्या चित्रा वाघ यांनी डान्सबार आणि ऑर्केस्ट्रामध्ये काम करणाऱ्या महिलांच्या सन्मान, सुरक्षितता आणि कामगार हक्कांचा प्रश्न उपस्थित केला. यावेळी बोलताना डान्सबार असो किंवा ऑर्केस्ट्रा, तेथे काम करणाऱ्या महिलांच्या प्रतिष्ठेचे संरक्षण करण्यासाठी राज्य सरकारने स्पष्ट आणि कडक कार्यपद्धती तयार करणे आवश्यक आहे. विशेषतः गोकुळाष्टमीसारख्या धार्मिक उत्सवांमध्ये आयोजित होणाऱ्या काही कार्यक्रमांमध्ये महिलांकडून अश्लील व बीभत्स नृत्य सादर केली जातात. अशी खंत कायंदे यांनी व्यक्त करत त्यावर बंदी घालण्याची मागणी केली.

# ख्रिश्चन मिशनरींच्या जमिनींची तपासणी होणार! बावनकुळेंची घोषणा

■ मुंबई

**राज्यातील** ख्रिश्चन मिशनरींच्या नावावर असलेल्या जमिनींची तपासणी करण्यात येणार असल्याची घोषणा महसूल मंत्री चंद्रशेखर बावनकुळे यांनी आज विधानसभेत केली. जमाबंदी आयुक्तांकडून पुढील तीन महिन्यांत ही तपासणी केली जाणार असल्याची माहिती त्यांनी दिली.

नाशिक जिल्ह्यातील ख्रिश्चन



मिशनरी संस्थांच्या नावावर असलेल्या जमिनींचे अभिलेख तपासले जाणार आहेत. या चौकशीसाठी विभागीय आयुक्तांच्या अध्यक्षतेखाली जमाबंदी आयुक्त कार्यालयातील अधिकारी, पोलीस विभागातील अधिकारी आणि नोंदणी महानिरीक्षक कार्यालयातील अधिकाऱ्यांचा समावेश असलेली समिती स्थापन केली जाणार आहे.

तपासणीत अनियमितता आढळल्यास संबंधित खाजगी जमिनी शासनाच्या ताब्यात घेण्याबाबत विचार केला जाईल. तसेच ज्या ठिकाणी रहिवासी किंवा शासकीय बांधकामे आहेत, त्याबाबत स्वतंत्र निर्णय घेतला जाईल, असेही त्यांनी स्पष्ट केले.




# राज्यातील अतिवृष्टीवर चर्चा का नाही? विधानसभेत विरोधक आक्रमक

■ मुंबई

**राज्यातील** अतिवृष्टी, पूरस्थिती, दरडी कोसळणे, अपघात आणि नागरिकांच्या मृत्यूच्या घटनांवर चर्चा करण्याची मागणी करत विरोधकांनी आज विधानसभेत आक्रमक भूमिका घेतली. लक्षवेधी पुढे ढकलल्याने विरोधकांनी सरकारविरोधात जोरदार घोषणाबाजी केली. यावेळी सत्ताधारी आणि विरोधक आमने -सामने असल्याने सभागृहाचे कामकाज पाच मिनिटांसाठी तहकूब करण्यात आले.

महाराष्ट्रात माणसे मरत आहेत, पूर येत आहेत, पूल कोसळत आहेत, अपघात होत आहेत. पण सरकार या गंभीर विषयांवर चर्चेलाही तयार नाही असा आरोप विरोधी पक्षाच्या सदस्यांनी केला. यावेळी सभागृहात सत्ताधारी आणि विरोधकांकडून एकमेकांविरोधात घोषणाबाजी करण्यात आली. राज्य सरकारला पूरस्थितीची काळजी नाही, असा आरोप काँग्रेस आमदार नाना पटोले यांनी केला. उबाठा आमदार भास्कर जाधव यांनीही सरकारला धारेवर धरले. भास्कर जाधव म्हणाले की, आज अधिवेशन सुरू आहे पण महाराष्ट्राच्या जनतेच्या प्रश्नांवर चर्चा होत नाही. यातून जनतेला काय संदेश जात आहे? सरकार या विषयावर गंभीर नाही. काल तुम्ही स्थगन प्रस्ताव मागे घ्या, सांगितले म्हणून आम्ही घेतला. पण आज चर्चा का होत नाही? लोकांचे प्रश्न, आपत्ती आणि नागरिकांच्या अडचणींवर सरकारने उत्तर दिले पाहिजे.



# घरकूल योजनांसाठी पैसे घेणाऱ्यांना सोडणार नाही! मंत्री गोरेंचा इशारा

■ मुंबई

**जालना** जिल्ह्यातील पंचायत समित्यांअंतर्गत घरकूल योजनांमध्ये गैरव्यवहार होत असल्याचा आरोप करत आमदार बबनराव लोणीकर यांनी आज विधानसभेतील प्रश्नोत्तराच्या तासात हा मुद्दा उपस्थित केला. यावर ग्रामविकास मंत्री जयकुमार गोरे यांनी चौकशीनंतर दोषींवर कारवाई केली जाईल. तसेच घरकूल योजनांसाठी पैसे घेणाऱ्यांना सोडणार नाही, असा इशारा दिला.

उत्तर देताना जयकुमार गोरे म्हणाले की, जालना जिल्ह्यातील दोन ते तीन सरपंचांनी या प्रकरणी तक्रारी केल्या आहेत. या प्रकरणाची चौकशी करण्यासाठी समिती स्थापन करण्यात आली आहे. चौकशी समितीचा अहवाल अद्याप प्राप्त झालेला नाही. अहवालातील निष्कर्षांच्या आधारे योग्य ती कारवाई केली जाईल.

घरकूल असो किंवा विहिरींचे काम असो, कोणाकडून पैसे घेतले जात असतील तर सरकार त्यांना सोडणार नाही. नागरिकांना योजनांसाठी पैसे मागितले जात असल्यास थेट तक्रार करता यावी. यासाठी प्रत्येक पंचायत समितीच्या बाहेर सूचना फलक लावण्यात येणार आहे.

# मंत्री, सचिवांची अनुपस्थिती विरोधकांचा पुन्हा गदारोळ

■ मुंबई

**विधानसभेत** विरोधकांच्या प्रस्तावांवर चर्चा सुरू असताना संबंधित मंत्री आणि सचिव उपस्थित नसल्याच्या मुद्द्यावरून आज पुन्हा गदारोळ झाला. विरोधकांनी सरकारवर जोरदार टीका करत हा सभागृहाचा आणि जनतेचा अपमान असल्याचा आरोप केला. गोंधळामुळे सभागृहाचे कामकाज १० मिनिटांसाठी तहकूब करण्यात आले. काँग्रेस विधिमंडळ पक्षनेते विजय वडेट्टीवारांनी या मुद्द्यावर आक्षेप घेताना सांगितले की, विरोधी पक्षाच्या प्रस्तावांवर चर्चा होत असताना संबंधित खात्याचे मंत्री आणि सचिव सभागृहात उपस्थित असणे अपेक्षित आहे. मात्र काही दिवसांपासून विरोधकांच्या प्रस्तावांवेळी ना मंत्री उपस्थित असतात, ना संबंधित सचिव. आम्ही यापूर्वीही ५ वेळा हा मुद्दा उपस्थित केला.

# शवविच्छेदन चिरफाडविना होणार मुख्यमंत्री फडणवीसांची घोषणा

■ मुंबई

**राज्यातील** शासकीय रुग्णालये आणि शवविच्छेदन केंद्रांचे आधुनिकीकरण करण्यासाठी सरकारकडून अत्याधुनिक तंत्रज्ञानाचा वापर केला जाणार असून ९० टक्के शवविच्छेदन चिरफाडविना करता येतील अशी माहिती मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी आज विधान परिषदेत दिली. प्रश्नोत्तराच्या तासात भाजपा आमदार चित्रा वाघ यांनी राज्यातील शवविच्छेदन केंद्रांमधील रिक्त पदे आणि सुविधांच्या अभावाबाबत प्रश्न उपस्थित केला होता. त्याला उत्तर देताना मुख्यमंत्री फडणवीस यांनी शवविच्छेदन प्रक्रियेत मोठे बदल करण्यात येणार असल्याचे सांगितले. मुख्यमंत्री म्हणाले की, जगभरात वापरली जाणारी नॉन-इन्व्हेझिव्ह म्हणजेच विना-चिरफाड शवविच्छेदन पद्धत महाराष्ट्रात आणली जाणार आहे. शरीराचा पेट स्कॅन करण्याच्या धर्तीवर ही प्रणाली काम करणार आहे. या अत्याधुनिक तंत्रज्ञानाचा पहिला प्रयोग मुंबईतील जे.जे. रुग्णालय आणि के.ई.एम. रुग्णालयात सुरू करण्यात येणार असून, यासाठी निविदा प्रक्रिया सुरू करण्यात आली आहे.

# मुंबईची तुंबई लोकांच्या चुकीमुळे पालिकेवर खापर फोडणे थांबवा

हायकोर्टाचे ताशेरे

■ मुंबई

**शहरात** पावसाळ्यात पाणी साचण्यात केवळ पालिकेवरच खापर फोडून चालणार नाही तर त्याला नागरिकही तेवढेच जबाबदार आहेत, अशी टिप्पणी करताना हायकोर्टाने बेकायदा बांधकामे आणि अतिक्रमणावर तीव्र नाराजी व्यक्त केली. प्रभारी न्यायमूर्ती रवींद्र घुगे आणि न्यायमूर्ती गौतम अखंड यांच्या खंडपीठाने शीव-ट्रॉम्बे मार्गावरील मंडाले



गावातील रस्ता रुंदीकरणासाठी जमिनीची मागणी करणाऱ्या मुंबई महानगरपालिकेच्या याचिकेच्या सुनावणी दरम्यान टिप्पणी करून अणुऊर्जा विभागाला (डीएई) नोटीस बजावत रस्त्यासाठी आवश्यक जमीन उपलब्ध करून देण्याबाबत निर्णय घेण्याचे निर्देश दिले.

खंडपीठाने मुंबईतील पावसाळ्यातील पाणी साचण्याच्या जुन्या समस्येवर अत्यंत तीव्र शब्दांत नाराजी व्यक्त केली. मुंबईतील पूरपरिस्थिती ही केवळ महापालिकेची चूक नाही तर ती आपली स्वतःची निर्मिती आहे, अशा शब्दांत न्यायालयाने नागरिकांच्या बेजबाबदार वृत्तीवर ताशेरे ओढले. तसेच, मान्सूनमधील पाणी साचण्याच्या समस्येसाठी फक्त बृहन्मुंबई महानगरपालिकेला दोष देणे थांबवावे, अशी टिप्पणी केली.

# सातारा-मिरज-दादर एक्स्प्रेस आता दररोज धावणार

■ कराड

**सातारा**-मिरज-दादर एक्स्प्रेस आता आठवड्यातून तीन दिवस न धावता दररोज धावणार आहे. प्रवाशांच्या वाढत्या मागणीमुळे रेल्वे प्रशासनाने हा निर्णय घेतला असून,यामुळे मुंबई-कोकण आणि पश्चिम महाराष्ट्रातील प्रवाशांना मोठा दिलासा मिळणार आहे, अशी माहिती केंद्रीय रेल्वेमंत्री अश्विनी वैष्णव यांनी शिवसेना ठाकरे गटाचे खासदार संजय राऊत यांना दिली आहे.ही सातारा-मिरज-दादर एक्स्प्रेस दररोज सोडण्याची मागणी करून खासदार राऊत यांनी रेल्वे मंत्रालयाकडे पाठपुरावा केला होता. दादर ते सातारा गाडी क्रमांक ११०२७ ही दादरवरून रात्री २३:५५ वाजता सुटेल आणि दुसऱ्या दिवशी दुपारी १४:१० वाजता सातारा येथे पोहोचेल. तसेच सातारा ते दादर गाडी क्रमांक ११०२८ ही गाडी साताऱ्यावरून दुपारी १५:३० वाजता सुटेल.

# १५ टक्के खाटा राखीव नसल्यास धर्मादाय रुग्णालयांवर कारवाई

मंत्री शंभूराज देसाईंची विधान परिषदेत माहिती

■ मुंबई

**राज्यातील** गरीब व गरजू रुग्णांसाठी १० टक्के पूर्ण मोफत व ५ टक्के सवलतीच्या दरात अशा १५ टक्के खाटा राखीव न ठेवणाऱ्या किंवा उपचारात हलगर्जीपणा करणाऱ्या खासगी धर्मादाय रुग्णालयांवर महाराष्ट्र शासनाकडून कठोर कारवाई केली जाईल, अशी माहिती मंत्री शंभूराज देसाई यांनी विधीमंडळ अधिवेशनात दिली.

आमदार अनिल परब यांनी ग्लोबल रुग्णालयाला पालिकेकडून विविध सवलती मिळूनही ते नियमानुसार १५ टक्के खाटा गरीब रुग्णांना सवलतीच्या दरात उपलब्ध करून देत नाही. त्यामुळे १५ टक्के खाटा गरीब रुग्णांना उपलब्ध झाल्या पाहिजेत,यासाठी महापालिकेचे किंवा शासनाचे धोरण काय? या प्रकरणी शासन काय ठोस भूमिका घेणार? असे प्रश्न अनिल परब यांनी उपस्थित केले होते. यासंदर्भातील चर्चेत सदस्य नीलम गोऱ्हे, परिणय फुके, चंद्रकांत रघुवंशी, राजीव पोतदार, चित्रा वाघ, बच्चू कडू, निरंजन डावखरे, भाई जगताप, प्रमोद जठार आणि मनीषा कायंदे यांनी उपप्रश्न उपस्थित केले. यावर सुरुवातीला राज्यमंत्री माधुरी मिसाळ यांनी उत्तर दिले. त्यानंतर मंत्री शंभुराज देसाई यांनी चॅरिटी रुग्णालयांकडून नियमांचे पालन न झाल्यास संबंधित रुग्णालयावर कडक कारवाई करण्यात येईल, असे आश्वासन सभागृहात दिले.

# बीपीसीएल, विमा कंपनीने महिलेच्या मृत्यूची भरपाई द्यावी

न्यायालयाचे निर्देश

**मुंबई** -नागपूर येथील अतिरिक्त जिल्हा ग्राहक तक्रार निवारण आयोगाने गॅस सिलिंडर गळतीमुळे झालेल्या महिलेच्या मृत्यूप्रकरणी भारत पेट्रोलियम कॉर्पोरेशन आणि युनायटेड इंडिया इन्शुरन्स या कंपनीला निष्काळजीपणा आणि सेवेतील त्रुटींसाठी जबाबदार धरले आहे. न्यायालयाच्या निर्देशानुसार, मृत महिलेच्या कुटुंबियांना एकत्रितपणे ७.६० लाख रुपयांची नुकसानभरपाई देण्याचे आदेश देण्यात आले. ११ वर्षांपूर्वी म्हणजे २३ डिसेंबर २०१४ रोजी स्वयंपाक करताना सिलिंडर गळती होऊन अचानक आग लागली होती, ज्यामध्ये नागपूरच्या जयताळा रोडवरील घरात राहणारी महिला गंभीर भाजल्यामुळे तिचा दुर्दैवी मृत्यू झाला.

Vidya Vikas Education Society's
VIKAS COLLEGE OF ARTS, SCIENCE & COMMERCE
Affiliated to University of Mumbai
www.vikascollege.org
DAY SESSION
B.Sc. (General) I B.Sc. (I.T.)
B.Com. (Management Studies)
M.Sc. (I.T.) I M.Sc. (Organic Chemistry)
EVENING SESSION
B.A., B.Com.
B.A.F.
(B.Com. - Accounting & Finance)
M.Com. (Advanced Accountancy)
M.Com. (Business Management)
For more details call us on:
98693 21864 - Mr. Uday Kulkarni
98694 25190 - Prof. Milind Paradkar
98676 52772 - Prof. Athawale
95948 00926 - Prof. Yogesh Salvi
TILAK MAHARASHTRA VIDYAPEETH - PUNE
B.Sc. Computer Application - B.C.A.
B.Sc. Business Administration - B.B.A.
M.Sc. Computer Application - M.C.A.
B.Sc. Data Science & AI (Artificial Intelligence)
98215 23790 - Dr. Vikas Raut
Y.C.M.O.U. NASHIK
B.A. I B.Com. I M.B.A.
90296 94373 - Prof. Vinayak Muley
Vikas College of Arts, Science & Commerce, Kannamwar Nagar-2, Vikhroli (East), Mumbai-400083.

# कराडमध्ये पावसाची उसंत शेतकरी वर्गाला अल्प दिलासा

■ कराड

**मागील** पाच दिवसांपासून संपूर्ण तालुक्यात मुसळधार पावसाने अक्षरशः धुमाकूळ घातला होता. सततच्या पावसामुळे जनजीवन विस्कळीत झाले होते. अनेक ठिकाणी रस्त्यांवर पाणी साचले,तर ग्रामीण भागातील शेतीची कामे ठप्प झाली होती. मात्र, काल मंगळवारी पावसाचा जोर काहीसा ओसरल्याने शेतकरीवर्गाला काही प्रमाणात दिलासा मिळाला आहे.

काल पश्चिमेकडील तालुक्यांत दिवसभर अधूनमधून हलक्या ते मध्यम स्वरूपाच्या सरी कोसळत होत्या. त्यामुळे शहरासह ग्रामीण भागातील दैनंदिन व्यवहार पूर्वपदावर येऊ लागले. बाजारपेठांमध्ये ग्राहकांची वर्दळ वाढली,तर नागरिक आवश्यक कामांसाठी बाहेर पडू लागले. पावसाने काही काळ विश्रांती घेतल्याने शेतकरी पुन्हा शेतात उतरले आहेत. खरीप हंगामातील पेरणी, तणनियंत्रण तसेच इतर शेतीची कामे वेगाने सुरू झाली आहेत. सलग पावसामुळे रखडलेली शेतीची कामे पूर्ण करण्यासाठी अनेक शेतकऱ्यांनी दिवसभर शेतातच मेहनत घेत आहेत.

# कुडावळे काटकरवाडी येथे पुलाचा भराव वाहून गेला

■ दापोली

गेल्या चार दिवसांपासून सुरू असलेल्या मुसळधार पावसामुळे दापोली तालुक्यातील अनेक भागांमध्ये जनजीवन विस्कळीत झाले असून, कुडावळे गावातील काटकरवाडी येथील पुलाचा भराव वाहून गेल्याने स्थानिक नागरिकांची मोठी गैरसोय झाली आहे.

सतत कोसळणाऱ्या पावसामुळे पुलाच्या एका बाजूचा भराव पूर्णपणे खचून वाहून गेला आहे. त्यामुळे पुलावरून वाहतूक धोकादायक बनली असून नागरिकांना जीव धोक्यात घालून ये-जा करावी लागत आहे. विशेषतः शालेय विद्यार्थी, शेतकरी, ज्येष्ठ नागरिक तसेच अत्यावश्यक सेवांसाठी प्रवास करणाऱ्यांना याचा मोठा फटका बसत आहे.

या घटनेची माहिती मिळताच प्रशासनाने परिस्थितीची दखल घेतली आहे. दापोली तहसीलदार अर्चना बोंबे यांनी संबंधित यंत्रणांना पाहणी करून आवश्यक उपाययोजना करण्याच्या सूचना दिल्याचे सांगितले.

# वीज संकटावरून सावंतवाडीत नाराजी केसरकरांच्या कार्यपद्धतीवर प्रश्नचिन्ह

■ सावंतवाडी

**सततच्या** वीज खंडित होण्याच्या समस्येमुळे सावंतवाडी विधानसभा मतदारसंघातील नागरिकांमध्ये तीव्र नाराजी निर्माण झाली आहे. महावितरणच्या कारभारावर प्रश्नचिन्ह उपस्थित करत स्थानिक आमदार दीपक केसरकर यांच्या कार्यपद्धतीवरही नागरिकांनी टीका केली आहे. निवडणुकीनंतर मतदारसंघातील वीज, पर्यटन, आरोग्य, सार्वजनिक बांधकाम आणि पायाभूत सुविधांच्या प्रश्नांकडे पुरेसे लक्ष दिले जात नसल्याची भावना नागरिकांनी व्यक्त केली. अनेक समस्यांवर केवळ तात्पुरते उपाय केले जात असून कायमस्वरूपी तोडगा निघत नसल्याची खंतही त्यांनी मांडली. मान्सूनपूर्व नियोजन बैठका एप्रिल-मे महिन्यात होणे अपेक्षित असताना प्रत्यक्षात संकट निर्माण झाल्यानंतरच बैठका घेतल्या जात असल्याची टीका नागरिकांनी केली.




Vidya Vikas Education Society's
Vikas High School & Junior College
BMC Building, Kannamwar Nagar-1, Vikhroli (East), Mumbai-83.
11th & 12th (General)
Arts / Commerce / Science
Commerce with Maths Subject (Unaided)
Science with I.T. Subject (Unaided)
Shri. Pawar - 98195 09215
Dr. Babasaheb Ambedkar Vidyalaya & Junior College (Self-Financed)
Station Rd, Behind Bus Depot, Near ICICI Bank, Vikhroli (E), Mumbai-83.
11th & 12th Commerce
Shri. Suvarna - 99691 61240
Vikas Ratrashala & Junior College
BMC Building, Kannamwar Nagar - 1, Vikhroli (E), Mumbai-83.
8th to 10th Std.
11th & 12th (Aided) Arts / Commerce / Science
Commerce & Science with I.T. subject (Unaided)
Time: Evening 6.30 to 9.30 pm
Shri. Vhatkar - 99690 10495
Vidya Vikas Night High School & Junior College
BMC Building Room No.1, Ramabai Ambedkar Nagar, Ghatkopar (East), Mumbai-400077.
8th to 10th Std.
11th & 12th (Aided) Commerce
Shri. Kule 91464 64334
Swami Shamanand High School & Junior College
Bhatwadi, Ghatkopar (West), Mumbai-400086.
11th & 12th Commerce in IT
Build your strong foundation for successful career in COMMERCE
Smt. Dongare - 86526 66979

संस्थापक-नाट्याचार्य कृष्णाजी प्रभाकर खाडिलकर

संपादकीय

नवाकाळ

॥ न मे भक्त प्रणश्यति ॥

# राजकीय दहशतीचे अतिरेकी तंत्र

आपल्या देशामध्ये लोकशाहीने दिलेल्या स्वातंत्र्याचा अनेक ठिकाणी अतिरेकी वापर होतो आणि हे अनेक घटनांमधून वारंवार सिद्ध झालेले आहे. आमचे तर नेहमी असे म्हणणे आहे की, या स्वातंत्र्याचा सर्वात अतिरेकी वापर राजकारणी लोक करीत असतात. त्यांना मिळणारी सत्ता किंवा राजकारणात वावरत असताना अनेक प्रकारच्या अधिकाराचा ते मनमानी वापर करतात. त्यातून स्वतःचा राजकीय दबदबा निर्माण करून राजकीय दहशत तयार करण्याचाही त्यांचा हेतू असतो. अशाच प्रकारची घटना डोंबिवलीच्या शास्त्रीनगर इथल्या सरकारी रुग्णालयात घडली. तिथल्या डॉक्टर आणि काही पारिचारिकांना म्हणजेच नर्सेसला मारहाण करण्याचा तिथले नगरसेवक रमेश म्हात्रे यांनी केलेला प्रकार याच राजकीय दहशतीचा भाग ठरतो. यासंदर्भात पोलीस कारवाई जरी झाली असली तरीसुद्धा मारहाण करतानाची चित्रफित बघितल्यानंतर कायदा आणि सुव्यवस्था राजकारण्यांकडून किती सहजपणे धाब्यावर बसवली जाते याचा तो ताजा नमुना म्हणावा लागतो. कल्याण मतदारसंघाचे संसदेमध्ये प्रतिनिधित्व करणारे हेसुद्धा एक डॉक्टरच आहेत. डॉ. श्रीकांत शिंदे यांच्या मतदारसंघात त्यांच्याच पक्षाच्या नगरसेवक आणि त्याच्या तथाकथित कार्यकर्त्यांनी डॉक्टरना अतिशय अमानुष पद्धतीने केलेली मारहाण आणि त्यातही महिला चालकांवर हात उचलण्याचा केलेला प्रयत्न अत्यंत निषेधार्ह ठरतो. डॉक्टर खासदारांच्या मतदारसंघामध्ये तिथले डॉक्टरही सुरक्षित नाहीत असेही म्हणण्याची वेळ येते. हा प्रकार केवळ एका विशिष्ट पक्षाच्याबाबतीत घडला आहे असे नाही. याला कोणताही राजकीय पक्ष अपवाद ठरू शकत नाही. प्रत्येक पक्षाकडून अशीच दादागिरी सुरू असते. त्या त्या ठिकाणचे चिल्लर स्थानिक कार्यकर्तेसुद्धा इतक्या विचित्र पद्धतीने अशी दबंगगिरी करीत असतात. या सगळ्या दादागिरीचे बळी प्रामुख्याने त्या त्या ठिकाणचे सरकारी कर्मचारीच मोठ्या प्रमाणावर ठरतात. मग कधी टोल नाक्यावरचे कर्मचारी असतील. कधी रुग्णालयातले डॉक्टर्स असतील. कधी सरकारी कार्यालयातले कर्मचारी किंवा अधिकारी असतील. त्यांना मारझोड करण्याचे प्रकार अनेक ठिकाणी घडून येतात.

**राजकीय दहशतीचाच भाग**

सरकारी कर्मचाऱ्यांकडून चुका होतही असतील. पण या चुकांविषयी दाद मागण्याची त्यांच्या चुकांना दुरूस्त करण्याची आपल्याकडे कायद्यानेच काही व्यवस्था निर्माण करून दिलेली आहे. पण त्या कायद्याला बाजूला ठेवून कायदा हातात घ्यायचा. आणि आपल्या मनमानी पद्धतीने दहशत निर्माण करण्याचे प्रकार होत असतात. बऱ्याचवेळेला तर थेट सरकारी कार्यालयात घुसून तिथल्या फर्निचरची तोडमोड करणे, खुर्च्या अंगावर फेकणे, तिथल्या कर्मचाऱ्यांच्या तोंडाला काळे फासणे हे प्रकारही केले जातात. ज्या ठिकाणी अन्याय झालेला आहे, त्याचा जाब विचारण्याचा अधिकार आपल्याला घटनेने किंवा कायद्याने दिलेला आहे. पण जाब विचारतानासुद्धा त्या ठिकाणी हिंसाचार करण्याची कोणालाही कायद्याने अनुमती दिलेली नाही. दुर्दैवाची गोष्ट अशी आहे की, कायदा नियम हे फक्त सामान्य माणसासाठी आहेत. आणि राजकारण्यांसाठी मात्र कायदे धाब्यावर बसवण्यासाठीच तयार झालेले आहेत. अशी आज परिस्थिती पाहायला मिळते. आता या नगरसेवकाविरुद्ध कारवाई होईल. त्याला अटक होण्याची शक्यता व्यक्त झाली होती. माफी मागून तो स्वतःची सुटका करून घेण्यासाठी प्रयत्न करेल. परंतु एवढ्यावर हे प्रकरण थांबून चालणार नाही. अशा राजकीय दहशतीच्या प्रकारांना आळा घालायचा असेल तर या गैरकृत्यांना योग्य त्या शिक्षाही झाल्या पाहिजेत. यातला कोणताही दोषी मोकळा सुटता कामा नये. जोपर्यंत शिक्षा होत नाही तोपर्यंत हे प्रकार थांबण्याची शक्यता नाही. बऱ्याच वेळेला असे दहशत माजवणारे राजकारणी आपला कार्यभाग साधून घेतात. दहशत निर्माण करण्याचा त्यांचा उद्देशही साधला जातो. आणि नंतर जामिनावर सुटताच त्याबद्दलचे खटले कालांतराने काढून टाकण्याचाही प्रकार घडतो. म्हणूनच या प्रकरणात अधिकाधिक कडक शिक्षा होणे तितकेच गरजेचे आहे. विशेषतः रुग्णालयातल्या डॉक्टरांबाबतीत हे प्रकार वारंवार पाहायला मिळतात. त्यातही ही सरकारी किंवा महानगरपालिकेची रुग्णालये असतात. त्याठिकाणी सेवेवर असणाऱ्या डॉक्टर्स आणि कर्मचाऱ्यांबाबतीत असे हल्ले होण्याच्या घटना घडतात.

**उपचार करताना देवदूत**

अनेक ठिकाणी रुग्णाचे नातेवाईक मागचा पुढचा विचार न करता जो काही प्रकार झाला असेल त्याला डॉक्टर दोषी आहे असे समजून संतापाच्या भरात संबंधित डॉक्टरांवर हल्ला करण्याचा प्रयत्न करतात. डॉक्टर दोषी असेल तर त्याच्या विरुद्धसुद्धा तक्रार करण्याच्या किंवा दाद मागण्याच्या पद्धती उपलब्ध आहेत. यातून सरळ मारहाण करण्याचे तंत्र अवलंबले जाते. यात सरकारी सेवा जिथे जिथे मिळतात तिथेसुद्धा दहशत निर्माण करण्याचाच तो एक भाग ठरतो. डॉक्टरांवर हल्ले होण्याचे प्रकार सातत्याने वाढत गेल्यानंतर त्यासंदर्भात स्वतंत्र नियम केले गेले आहेत. प्रत्येक रुग्णालयाच्या दर्शनी भागात डॉक्टरांना मारहाण झाली तर त्याबद्दल काय शिक्षा होऊ शकते. याची माहिती देणारे फलक लावलेले असतात. ज्यावेळेला डॉक्टर उपचार करतात त्यावेळेला ते आपल्याला देवदूतासारखे वाटतात. परंतु त्यांच्याबाबतीत गैरसमज आणि गैरव्यवस्था झाली तर थेट मारहाण करण्यापर्यंत मजल जाते. निदान वैद्यकीय क्षेत्रामध्ये डॉक्टरांनी जसे जबाबदारीने वागण्याची अपेक्षा ठेवली जाते. तशीच सामाजिक सभ्यता म्हणूनसुद्धा ती प्रत्येकाची जबाबदारी ठरते. डोंबिवलीमधल्या प्रकाराची दखल गांभीर्याने घेतली पाहिजे. स्वाभाविकपणे या घटनेला राजकीय रंग दिला जाईल. नगरसेवकपद रद्द करण्याचीही मागणी होईल. परंतु मागणी करणारे राजकीय लोकच असतात. आणि त्यांच्याही कार्यकर्त्यांकडून अशा प्रकारची दांडगाई होत असते. प्रत्येक राजकीय पक्षाने याबाबतीत आत्मपरीक्षण केले पाहिजे. अगदी आपापल्या विभागात किंवा मतदारसंघांमध्येसुद्धा लोकप्रतिनिधींच्या सेवाकार्यापेक्षा त्यांच्या या राजकीय दबंगगिरीची चर्चा असे हे विसरून चालणार नाही.

## सुविचार

**विलास कोळेकर**
**मालेवाडी, जि. सांगली.** मोबा.९४२२४२०६११

आयुष्यात शांत राहण्याचा उत्तम
मार्ग म्हणजे, ज्या गोष्टी आपण बदलू शकत नाही
त्याबद्दल विचार करणे सोडून देणे.

## पंचांग





**गुरुवार, ९ जुलै २०२६**
**शक १९४८ पराभवनामसंवत्सर**
*** निज ज्येष्ठ कृष्ण नवमी**
**नक्षत्र : अश्विनी**
**-: जन्मराशी :-**
**००-०१ ते २४-०० मेष**

**रवी उदय- ०६-०९**
**रवी अस्त- १९-१९**

**जया पार्वती व्रतारंभ**

मुद्रक, प्रकाशक **सौ. जयश्री रमाकांत खाडिलकर-पांडे** यांनी हे दैनिक नवाकाळ ऑफीस आणि नवाकाळ प्रेस करिता दांगट मीडिया प्रा.लि., पत्ताः प्लॉट नं. २२, दिघा एमआयडीसी, टीटीसी इंडस्ट्रीयल एरीया, विष्णू नगर, दिघा, नवी मुंबई -४००७०८ येथे छापून घेतले व नवाकाळ बिल्डिंग, १३ नवाकाळ पथ, खाडीलकर रोड, गिरगांव, मुंबई -४००००४ येथे प्रसिद्ध केले.
संपादक : **रोहित रमाकांत पांडे** • कार्यकारी संपादकः **समीर करंबे** (*पी.आर.बी. कायद्यानुसार संपादकीय जबाबदारी कार्यकारी संपादक यांच्यावर आहे.)

संपर्क : संपादक विभागः ८६५२२०१४४०,
जाहिरात विभाग : ८१०८११६४२३, ८१०८११६४२९,
छोट्या जाहिरातीः ८४२२८१७४४५. वितरण विभाग : ९५९४९३६४४१
ई-मेलः contact@navakal.in
'नवाकाळ ऑफिस व नवाकाळ प्रेस'चे प्रकाशन दैनिक
'नवाकाळ' आर.एन.आय.क्र.१८१४/५७
स्थापना ७ मार्च १९२३/ फाल्गुन वद्य ५ शके १८४४

Printed and Published by **Jayshree Ramakant Khadilkar-Pande** On behalf of Navakal Office And Navakal Press. Printed at Dangat Media Pvt. Ltd., Address : Plot No.22, Digha M.I.D.C., TTC Industrial Area, Vishnu Nagar, Digha, Navi Mumbai - 400 708. Published at Navakal Building, 13 Navakal Path, Khadilkar Road, Girgaum, Mumbai - 400 004.
Editor - **Rohit Ramakant Pande** • Executive Editor - **Sameer Karambe** (*As per P.R.B. law Executive Editor will be responsible for all the content in Daily Navakal)

## पाककृती



### फणस बी भाजी



★ **साहित्य :** १ वाटी हिरवे वाटाणे, १ वाटी फणस बी, १ मोठा कांदा, २ हिरव्या मिरच्या, २ चमचा मसाला, १ चमचा हळद, १ चमचा धणे-जिरे पावडर, २ पळी तेल, चवीनुसार मीठ, १ चमचा साखर.

★ **कृती :** फणसाच्या आठळ्या स्वच्छ धुऊन प्रेशर कूकरमध्ये २-३ शिट्ट्या होईपर्यंत उकडून घ्या. आठळ्या शिजायला जरा जास्त वेळ लागतो. त्यानुसार शिट्या काढायच्या. उकडलेल्या बिया गार करायच्या. थंड झाल्यावर सोलून आतली फक्त बी काढायची. बीचे दोन तुकडे करून घ्यायचे. एका कढईत तेल घ्यायचे. तेल जरा तापले की, त्यात जिरे घालायचे. जिरे जरा छान फुलल्यावर त्यात बारीक चिरलेला कांदा घालायचा. कांदा मस्त गुलाबी परतून घ्यायचा. कांदा परतल्यावर त्यात हिरव्या मिरचीचे तुकडे घालायचे. नंतर उकडून ठेवलेल्या आठळ्यांचे तुकडे घालायचे. जरा वाफ काढून घ्यायची.

तुकडे छान परतले गेले पाहिजेत. त्यात थोडे मीठ घालायचे. चमचाभर हळद घालायची. चमचाभर लाल तिखट घालायचे. भाजी छान ढवळून घ्यायची. त्यात थोडा गूळ घालायचा. गूळ किसून घ्यायचा आणि मगच घालायचा. गूळ जरा विरघळला की, त्यात थोडा ताजा नारळ घालायचा. नारळ परतायचा. मग त्यात दाण्याचे कुट घालायचे. दाण्याचे कुट जरा परतायचे. त्यात चमचाभर गरम मसाला घालायचा. बारीक चिरलेली कोथिंबीर घालायची. सगळं छान परतून घ्यायचे. मग त्यात थोडे पाणी घालायचे. भाजी शिजल्यावर पाणी जाऊ द्यायचे. पाणी कमी झाल्यावर भाजी एकदम घट्ट होते. अशाप्रकारे आपली पारंपारिक भाजी तयार आहे.

## क्रीडा



# ७२ वर्षांनी स्वित्झर्लंड विश्वचषकाच्या उपांत्यपूर्व फेरीत

## पेनल्टी शूटआऊटमध्ये कोलंबियाचा ४-३ ने पराभव

**फिफा विश्वचषकाच्या उपांत्यपूर्व फेरीत पोहोचून स्वित्झर्लंडने इतिहास रचला. कॅनडाच्या व्हँकुव्हर येथे झालेल्या उपउपांत्यपूर्व फेरीत स्वित्झर्लंड आणि कोलंबियाचा सामना निर्धारित वेळेत ०-० असा बरोबरीत सुटला. त्यानंतर सामना पेनल्टी शूटआऊटमध्ये गेला आणि त्यात स्वित्झर्लंडने ४-३ ने विजय मिळवला. या विजयासह स्वित्झर्लंडने तब्बल ७१ वर्षांनंतर उपांत्यपूर्व फेरीत धडक मारली आणि स्वित्झर्लंडचा सामना ११ जुलैला मिसूरीमधील कॅन्सस सिटी येथील रोहेड स्टेडियमवर गतविजेत्या अर्जेंटिनाशी होणार आहे.**



■ व्हँकुव्हर

**पहिल्या** शूटआऊटमध्ये स्वित्झर्लंड आणि कोलंबियाने गोल केला. दुसऱ्या शूटआऊटमध्ये स्वित्झर्लंडच्या जॅक अमाडोनीने गोल केला, पण कोलंबियाच्या डेव्हिन्सन सांचेझची पेनल्टी क्रॉसबारला लागली. स्वित्झर्लंडच्या मॅन्युएल अकांजीने तिसरी पेनल्टी चुकवली, ज्यामुळे स्कोअर २-२ झाला. त्यानंतर स्वित्झर्लंडच्या कुचो हर्नांडेझची पेनल्टी स्विस गोलकीपर ग्रेगर कोबेलने उत्कृष्टरित्या वाचवली. अखेरीस, रुबेन व्हार्गासने निर्णायक पेनल्टीवर गोल करून स्वित्झर्लंडला विजय मिळवून दिला. स्वित्झर्लंड फुटबॉल संघाने १९५४ नंतर प्रथमच उपांत्यपूर्व फेरी गाठली. ७२ वर्षांपूर्वी त्यांनीच आयोजित केलेल्या स्पर्धेत हा संघ उपांत्यपूर्व फेरीत पोहोचला होता. या विजयामुळे स्वित्झर्लंडने आणखी एक विक्रम प्रस्थापित केला.

एकाच विश्वचषकात एकापेक्षा जास्त बाद फेरीचे सामने जिंकण्याची संघाची ही पहिलीच वेळ आहे. यापूर्वी स्वित्झर्लंड संघाने विश्वचषकाच्या एकाच आवृत्तीत सलग दोन बाद फेरीचे विजय कधीही मिळवले नव्हते. स्वित्झर्लंडचे प्रशिक्षक मुरात याकिन विजयानंतर अत्यंत उत्साहित होते. ते म्हणाले, हा एक अविश्वसनीय प्रवास आहे. आता आमचे संपूर्ण लक्ष गतविजेत्या अर्जेंटिना विरुद्धच्या उपांत्यपूर्व फेरीच्या सामन्यावर असेल.

**१० जुलैचा उपांत्य पूर्व सामना**

| भारतीय वेळ | संघ |
|---|---|
| मध्यरात्री १.३० | फ्रान्स विरुद्ध मोरोक्को |

# वेस्ट इंडिज घरच्या मैदानावर ४ वर्षांनी प्रथमच कसोटी मालिका जिंकली

■ गयाना



**नॉर्थ** साउंड येथे झालेल्या दोन कसोटी मालिकेतील शेवटचा सामना यजमान वेस्ट इंडिज संघ आणि श्रीलंकेचा ड्रॉ झाला. त्यामुळे ही मालिका वेस्ट इंडिजने १-० ने जिंकली. वेस्ट इंडिज संघाने ४ वर्षांत प्रथमच घरच्या मैदानावर कसोटी मालिका जिंकली. वेस्ट इंडिजने मालिकेतील पहिला सामना एक डाव आणि २१७ धावांनी जिंकला होता.

प्रथम फलंदाजी करताना श्रीलंकेने ९ बाद ५४९ धावा केल्या होत्या. या प्रत्युत्तरात वेस्ट इंडिजने ४९९ धावा ठोकल्या. त्यामुळे पहिल्या डावात श्रीलंकेने ५० धावांची आघाडी घेतली. मग कसोटीच्या अंतिम दिवशी श्रीलंकेने आपला दुसरा डाव २ बाद ९२ या धावसंख्येवरून पुन्हा सुरू केला. त्यांनी ९ बाद २५१ धावांवर डाव घोषित करून वेस्ट इंडिजपुढे ३०२ धावांचे लक्ष्य ठेवले. दुपारच्या जेवणानंतर फलंदाजी करताना वेस्ट इंडिजने चहापानाच्या विश्रांतीपर्यंत एकही गडी न गमावता ६५ धावा केल्या होत्या. अंतिम सत्रात हलक्या पावसामुळे १० मिनिटांसाठी खेळ थांबवण्यात आला. जेव्हा खेळ पुन्हा सुरू झाला, तेव्हा वेस्ट इंडिजची धावसंख्या बिनबाद १०९ होती.

# शालेय क्रीडा स्पर्धेत महाराष्ट्राचा डंका

■ पुणे

**भारतीय** शालेय स्पर्धा महासंघाच्या शालेय क्रीडा स्पर्धेत सलग तिसऱ्यांदा सर्वसाधारण विजेतेपदाची हॅट्ट्रिकचा पराक्रम महाराष्ट्राने केला. विजेतेपदकाचा करंडक क्रीडा व युवक कल्याण विभागाच्या आयुक्त दीपक सिंगला यांच्याकडे सुपूर्द करण्यात आला आहे. गतविजेत्या महाराष्ट्राने अपेक्षेप्रमाणे सर्वोत्तम कामगिरी करत ६९ व्या राष्ट्रीय शालेय क्रीडा स्पर्धेतही महाराष्ट्राने सर्वसाधारण विजेतेपदाचा पराक्रम केला आहे. १८७ सुवर्ण, १६९ रौप्य, १९० कांस्य अशी एकूण ५४६ पदकांची लयलूट करीत महाराष्ट्राने अव्वल स्थानाचे शिखर सर केले आहे. पुण्यातील शिवछत्रपती क्रीडा संकुलात विजेतेपदकाचा करंडक क्रीडा व युवक सेवा संचलनालय आयुक्त दीपक सिंगला यांच्याकडे सहसंचालक सुधीर मोरे, उपसंचालक उदय जोशी यांनी सुपूर्द केला आहे.

# विश्वचषक फिक्स! अर्जेंटिनाकडून पराभूत झाल्यानंतर इजिप्तचा पंचावर गंभीर आरोप

■ अटलांटा



**फिफा** विश्वचषकात अर्जेंटिनाविरुद्धच्या उपउपांत्यपूर्व फेरीत इजिप्तच्या संघाने पंचांवर गंभीर आरोप केले. २-० ने आघाडीवर असताना व्हीएआरद्वारे इजिप्तच्या मोस्तफा झिकोने तिसरा गोल नाकारल्यामुळे आणि इतर वादग्रस्त निर्णयांवरून इजिप्तच्या खेळाडूंनी सामन्यात 'फिक्सिंग' झाल्याचा थेट दावा केला.

सामन्याच्या ६० व्या मिनिटाला मोस्तफा झिकोने गोल केला आणि संपूर्ण संघाने जल्लोषदेखील केला. त्यानंतर पंचांनी व्हीएआर घेऊन व्हिडिओ पाहिला. मग हा गोल करण्याआधीच्या इजिप्तच्या खेळाडूने फाऊल केल्याचे कारण सांगून पंचांनी हा गोल अवैध ठरवला. इजिप्तचे मुख्य प्रशिक्षक होसाम हसन आणि फॉरवर्ड मोस्तफा झिको यांनी पंचांच्या निर्णयांवर तीव्र संताप व्यक्त केला. पंचांनी अर्जेंटिनाला झुकते माप दिले आणि इजिप्त जिंकावा अशी पंचांची अजिबात इच्छा नव्हती, असा आरोप त्यांनी केला. मुस्तफा झिकोने अत्यंत टोकाची भूमिका घेत आमच्यावर अन्याय केला आहे. ही स्पर्धाच फिक्स आहे, असे म्हटले. अर्जेंटिनाला आणि लिओनेल मेस्सीला विश्वचषकात पुढे नेण्यासाठीच हे निर्णय घेतल्याचा दावा इजिप्तच्या खेळाडूने केला. अन्यायाविरोधात इजिप्त फुटबॉल असोसिएशनने थेट जागतिक फुटबॉल नियामक फिफाकडे अधिकृत तक्रार नोंदवली. या प्रकरणी मुख्य पंच फ्रँकोइस लेटेक्सियर यांच्या संपूर्ण पथकाची चौकशी करण्याची आणि त्यांना विश्वचषकातून बाहेर काढण्याची मागणी इजिप्तने केली आहे.

# जोकोविचने जिंकला इतिहासातील सर्वात लांब उपांत्यपूर्व सामना

■ लंडन

**टेनिसचा** दिग्गज आणि २४ वेळा ग्रँड स्लॅम विजेता नोव्हाक जोकोविचने पुन्हा एकदा आपला झुंजारपणा दाखवत विम्बल्डनच्या उपांत्य फेरीत आपले स्थान निश्चित केले. उपांत्यपूर्व फेरीत त्याचा सामना कॅनडाच्या तिसऱ्या मानांकित फेलिक्स ऑगर-अलियासिमशी झाला. जोकोविचने हा रोमांचक पाच सेटचा सामना ७-६, ३-६, ६-३, ६-७, ७-६ असा जिंकला. त्यांच्यातील सामना तब्बल ५ तास आणि १५ मिनिटे चालला. हा विम्बल्डनच्या इतिहासातील सर्वात लांब उपांत्यपूर्व सामना आहे. हा जोकोविचच्या विम्बल्डन कारकिर्दीतील सर्वात लांब सामना होता. सामन्याच्या सुरुवातीपासूनच जोकोविचला अडचणींचा सामना करावा लागला.

## ऑगस्टमध्ये भारत 'अ' संघ न्यूझीलंड दौऱ्यावर जाणार

■ नवी दिल्ली

**भारत** 'अ' क्रिकेट संघ ऑगस्टमध्ये न्यूझीलंडचा दौरा करणार आहे. या दौऱ्यात ३ लिस्ट-ए सामने आणि २ प्रथम श्रेणी सामने खेळवले जातील. वरिष्ठ भारतीय पुरुष संघाने न्यूझीलंडमध्ये ऑक्टोबर-नोव्हेंबरमध्ये होणाऱ्या बहु-प्रारूप मालिकेपूर्वी खेळाडूंना तिथल्या परिस्थितीशी जुळवून घेता यावे, हा या दौऱ्याचा मुख्य उद्देश आहे. न्यूझीलंड दौऱ्यावर तीन ५०-षटकांचे सामने आणि दोन अनधिकृत कसोटी सामने खेळवले जातील. वरिष्ठ भारतीय संघ ऑक्टोबर ते डिसेंबर या काळात न्यूझीलंड दौऱ्यावर जाणार आहेत. या दौऱ्यात एकूण ५ टी-२०, ५ एकदिवसीय आणि २ कसोटी सामने खेळवले जातील.

**महाराष्ट्र औद्योगिक विकास महामंडळ**
(महाराष्ट्र शासन अंगिकृत)
**मुदतवाढ सूचना**
**ई निविदा सूचना क्र. २२/२०२६-२०२७ (मुंबई) करीता**

दिनांक ०३/०७/२०२६ रोजी दैनिक नवाकाळ, मुंबई, दैनिक हिंदूस्थान टाईम्स, मुंबई, दैनिक खबरें आजतक, मुंबई, दैनिक नवभारत, मुंबई, दैनिक रामप्रहर, रायगड या वृत्तपत्रामध्ये प्रसिद्ध झालेल्या वरील ई निविदा सूचनेतील खालील कामाकरीता ई निविदा शासनाच्या https://mahatenders.gov.in या संकेतस्थळावर उपलब्ध करण्याबाबत व कंत्राटदारांच्या मुद्यांचे निराकरण / महामंडळाचा खुलासा उपलब्धतेबाबत मुदतवाढ सूचना देण्यात येत आहे.

| अ. क्र. | कामाचे नांव | अंदाजित रक्कम |
|---|---|---|
| १. | दिघी बंदर-आधारित औद्योगिक क्षेत्रात 'Critical Mineral Processing Park' विकसित करण्यासाठी सल्लागाराची नियुक्ती करण्याबाबतचा प्रस्ताव विनंती अर्ज (RFP). | -- |

उपरोक्त कामांकरीता निविदा प्रपत्र दिनांक २०/०७/२०२६ पर्यंत शासनाच्या https://mahatenders.gov.in या संकेत स्थळावर उपलब्ध असतील. कंत्राटदारांच्या मुद्यांचे निराकरण /महामंडळाचा खुलासा दिनांक १४/०७/२०२६ पासून वर नमुद संकेत स्थळावर उपलब्ध होईल

ज्या निविदाधारकांनी यापूर्वी आपली निविदा भरली असेल अथवा अपलोड केली असेल, त्यांनी निविदेमध्ये बदल करुन किंवा बदल न करता सदर निविदा पुन्हा भरणे आवश्यक आहे, याची कृपया नोंद घ्यावी, अशा कंत्राटदारांनी शुद्धिपत्रकानंतर जर निविदा पुन्हा भरली नाही अथवा अपलोड केली नाही तर त्यांचा देकार सदर स्पर्धात्मक निविदेतून आपोआप बाद होईल.

सदर निविदा सूचनेत इतर कोणताही बदल करण्यात आलेला नाही.

# रात्री १० ते सकाळी ६ पर्यंतही स्विगी डिलिव्हरी सुरुच राहणार

**मुंबई-** भारतातील आघाडीच्या ऑन-डिमांड सुविधा प्लॅटफॉर्म स्विगीने रात्री उशिरापर्यंत काम करणाऱ्या व्यावसायिकांसाठी 'लेट नाईट ईट्स' ही नवी सेवा सुरू केली आहे. भारतातील ३० प्रमुख शहरांतील ४ हजारहून अधिक कार्यालयीन ठिकाणे आणि ३० हजारपेक्षा अधिक रेस्टॉरंट्समध्ये उपलब्ध असलेली ही सेवा रात्री १० ते पहाटे ५ वाजेपर्यंत ग्राहकांना निवडक खाद्यपदार्थ, आकर्षक सवलती, जलद डिलिव्हरी आणि '२ एएम क्लब'चा विशेष लाभ देणार आहे. जागतिक वेळेनुसार काम करणारे कर्मचारी, रात्रपाळीतील व्यावसायिक आणि वाढीव कामाचे तास असणाऱ्या कर्मचाऱ्यांच्या गरजा लक्षात घेऊन हा उपक्रम सुरू करण्यात आला आहे. या सेवेत बर्गर किंग, डॉमिनोज पिझ्झा, मॅकडोनाल्ड्स, केएफसी आणि सबवे यांसारख्या लोकप्रिय ब्रँड्सचे खाद्यपदार्थ उपलब्ध आहेत.




# घरात सगळं आहे पण कुणीतरी हरवलंय

**काल घरात चार्जर सापडत नव्हता. नेहमीच्या जागेवर नव्हता. मग शोधाशोध सुरू झाली. सोफ्याच्या फटीत बघितलं, बेडखाली बघितलं, टेबलावरच्या कागदांच्या ढिगाऱ्यात बघितलं. घरातल्या प्रत्येकाला विचारून झालं.**

**चार्जर** मिळाला आणि सगळ्यांनी सुटकेचा निःश्वास सोडला. पण त्याक्षणी मनात एक विचार आला, आपण घरात हरवलेल्या चार्जरसाठी इतके अस्वस्थ होतो, मग हळूहळू हरवत चाललेल्या माणसांचं काय?

कारण माणसं अचानक हरवत नाहीत.

ती घर सोडून जात नाहीत.

ती रोज आपल्या समोरच असतात.

सकाळी चहा देतात, ऑफिसला जातात, स्वयंपाक करतात, शाळेत जातात, टीव्ही पाहतात, मोबाईल स्क्रोल करतात

सगळं काही नेहमीसारखंच दिसत असतं.

फक्त त्यांच्या मनातलं काहीतरी हळूहळू बदलत असतं आणि ते बदल आपल्याला दिसत नाहीत. किंवा दिसले तरी आपण दुर्लक्ष करतो. कधीकाळी घरातली आई खूप बोलायची. तिला सगळ्यांच्या गोष्टी माहीत असायच्या. आता ती तशीच काम करते, पण आहे. मोठे टीव्ही आहेत. महागडे मोबाईल आहेत. वाय-फाय आहे. एसी आहे. सुखसोयी आहेत. पण कधी कधी वाटतं, घरातल्या माणसांपर्यंत पोहोचण्याचे रस्ते मात्र हरवले आहेत. एकाच घरात राहणारी माणसं दिवसभरात किती वेळ खरंच एकमेकांशी बोलतात?

जेवलास का? लाईट बंद कर. उद्या किती वाजता जायचं? याच्या पलीकडे किती संवाद उरला आहे? कधी कधी रात्री सगळे झोपल्यावर घरात एक विचित्र शांतता असते. त्या शांततेत घरातल्या प्रत्येक माणसाचा थकवा, त्याचं एकटेपण, त्याच्या न बोललेल्या गोष्टी भिंतींना कदाचित ऐकू येत असतील. फक्त आपल्यालाच ऐकू येत नाहीत. आणि गंमत म्हणजे हे सगळं कोणाच्या घरात घडत नाही. हे आपल्या सगळ्यांच्या घरात घडत असतं.

फरक एवढाच, आपण त्याला नाव देत नाही. आपण म्हणतो सगळं व्यवस्थित आहे.



मधेच खिडकीतून बाहेर बघत बसते.

काय विचार करत असेल? कोणी विचारत नाही. वडील पूर्वी एखादा विनोद सांगून सगळ्यांना हसवायचे. आता ते जेवण झाल्यावर शांतपणे उठून त्यांच्या खोलीत जातात. वय वाढलं म्हणून असेल, असं म्हणून आपण पुढे निघून जातो.

पण कदाचित वय वाढलेलं नसतं

एकटेपणा वाढलेला असतो.

आजी-आजोबांचं तर अजून वेगळंच.

त्यांच्याकडे वेळ असतो.

पण ज्यांच्यासाठी वेळ असतो, त्यांच्याकडे वेळ नसतो. पूर्वी घरातल्या प्रत्येक निर्णयात त्यांचा सहभाग असायचा. आज अनेकदा त्यांना फक्त माहिती दिली जाते. त्यांच्या गोष्टी ऐकताना आपण मोबाईलकडे बघत असतो. आणि तेही मग तीच गोष्ट अर्धवट सोडून गप्प होतात. वयाच्या एका टप्प्यावर माणसाला औषधांपेक्षा जास्त गरज असते ती सोबतीची.

पण हे लक्षात येईपर्यंत बऱ्याचदा खूप उशीर झालेला असतो. मुलंही हरवत आहेत. पूर्वी शाळेतून आली की, घरभर आवाज असायचा. आता दार उघडतं, बॅग ठेवली जाते आणि खोलीचं दार बंद होतं. आपल्याला वाटतं,

आजकालची पिढीच अशी आहे.

कदाचित असेलही.

पण कदाचित त्यांच्याही मनात काही प्रश्न असतील, काही भीती असतील, काही न सांगितलेली दुःखं असतील.

कुणास ठाऊक? आजकाल घरात सगळं कारण घरात भांडणं नाहीत.

सगळे आपापली कामं करत आहेत. कोणी तक्रार करत नाही, पण कधी कधी तक्रार न करणारी माणसं सर्वात जास्त थकलेली असतात. आणि शांत दिसणारी माणसं सर्वात जास्त हरवलेली असतात. आजही कदाचित आपल्या घरात कुणीतरी खिडकीतून बाहेर बघत असेल. कुणीतरी जुन्या फोटोंकडे पाहत असेल. कुणीतरी मोबाईल हातात धरून कोणाच्या फोनची वाट पाहत असेल. कुणीतरी सगळ्यांसाठी धावत असेल आणि मनातल्या मनात विचार करत असेल

माझ्यासाठीही कुणी थांबत असेल का?

हा प्रश्न मोठ्याने कोणी विचारत नाही.

म्हणून तो ऐकूही येत नाही.

कालचा चार्जर शेवटी सापडला.

पण त्या शोधात एक गोष्ट जाणवली

घरात हरवलेल्या वस्तू शोधणं खूप सोपं असतं. कारण त्या कुठे आहेत हे तरी आपल्याला माहीत असतं. अवघड असतं ते घरातच असलेल्या, आपल्या अगदी जवळ असलेल्या आणि तरीही हळूहळू दूर निघून गेलेल्या माणसांना पुन्हा शोधणं. आणि कधी कधी वाटतं आपल्या घरात चार्जर हरवलेला नसतोच. हरवलेलं असतं ते एखाद्या आईचं हसू, वडिलांचा मोकळेपणा, आजी-आजोबांच्या गोष्टी ऐकणारे कान किंवा मुलांच्या मनातलं बोलकं जग आणि त्या हरवलेल्या गोष्टींची शोधाशोध सुरू झाली तर कदाचित अनेक घरांना पुन्हा घरपण सापडेल.

# उबाठाचे १५ आमदार, २५ नगरसेवक जाणार! हिंदुस्थानी भाऊचा दावा

■ मुंबई

**यूट्यूबर** आणि सोशल मीडिया इन्फ्लुएन्सर विकास जयराम पाठक उर्फ हिंदुस्थानी भाऊ याने एक व्हिडिओ प्रसिद्ध करत उबाठातील तब्बल १५ आमदार आणि २५ नगरसेवक येत्या ७ सप्टेंबरपर्यंत पक्ष सोडतील, असा दावा केला आहे. या व्हिडिओमुळे राज्याच्या राजकीय वर्तुळात चर्चांना उधाण आले आहे.

इन्स्टाग्रामवर शेअर केलेल्या व्हिडिओमध्ये हिंदुस्थानी भाऊ म्हणाला की, उद्धव साहेब, जय महाराष्ट्र, जय श्रीराम! मी याआधीही सांगितले होते की, सांभाळा...अन्यथा १५ आमदार आणि २५ नगरसेवक पक्ष



सोडण्याच्या मार्गावर आहेत. सचिन अहिर यांच्या रूपाने पहिला बॉम्ब फुटला आहे. सप्टेंबरपर्यंत आणखी बरेच काही घडणार आहे. ७ सप्टेंबर ही तारीख लक्षात ठेवा. याच व्हिडिओमध्ये हिंदुस्थानी भाऊने खासदार संजय राऊतांच्या 'तुडवा ऑपरेशन' या वक्तव्याचा संदर्भ देत टीका केली. तो म्हणाला की, तुमचा अनिल कपूर काय बोलतोय? आता तुडवा ऑपरेशन चालू करणार? अरे, सचिन भाऊ अहिर कोण आहे? दगडी चाळ, अरुण भाई गवळी उर्फ डॅडी यांचे नाव ऐकले आहे ना? बाळासाहेब म्हणायचे, तुमच्याकडे दाऊद असेल तर आमच्याकडे गवळी आहे. हा भांडुपचा खोटा अनिल कपूर आहे ना, याला आता तरी तोंड बंद करायला सांगा.

# आरोपींची धिंड काढू नका कोलकाता हायकोर्टाचे निर्देश

■ कोलकाता

**आरोपीची** सर्वांसमक्ष धिंड काढण्याची परवानगी पोलिसांना न्यायव्यवस्थेने दिलेली नाही. तसे करणे म्हणजे संबंधित व्यक्तीच्या मानवी हक्कांचे उल्लंघन ठरते, असे महत्त्वपूर्ण निरीक्षण कोलकाता उच्च न्यायालयाने एका याचिकेवरील सुनावणीप्रसंगी नोंदवले.

तृणमूल काँग्रेस पार्टीचे नेते सौकत मुल्ला यांची पोलिसांनी तपासादरम्यान धिंड काढली होती. त्याविरोधात मुल्ला यांनी उच्च न्यायालयात धाव घेतली. मुल्ला यांच्या वतीने ज्येष्ठ विधिज्ञ ॲड. किशोर दत्ता यांनी युक्तिवाद केला. अलिकडच्या काळात आरोपीला अटक केल्यानंतर त्याची चारचौघात धिंड काढण्याची प्रवृत्ती पोलिसांमध्ये वाढल्याचे दिसते. ही बाब अत्यंत चिंताजनक आहे. आरोपीला अटक केल्यानंतर त्याला दंडाधिकारी न्यायालयात हजर करणे हे पोलिसांचे कर्तव्य आहे. केवळ संशयावरून कोणालाही दोषी ठरवण्याचा अधिकार पोलिसांना दिलेला नाही, असे ॲड. दत्ता यांनी न्यायालयात सांगितले. त्यांच्या या निवेदनावर न्यायालयाने सहमती दर्शवली.

# शाळांमध्ये मंत्र पठणाला परवानगी विरोधी याचिका कोर्टाने फेटाळली

■ रायपूर

**राज्यातील** शाळांमध्ये विद्यार्थ्यांकडून सरस्वती वंदना, गुरू मंत्र, गायत्री मंत्र व हिंदू धर्मातील अन्य मंत्रांचे पठण करून घेण्याच्या राज्य सरकारच्या परिपत्रकाला विरोध करणारी याचिका छत्तीसगढ उच्च न्यायालयाने फेटाळून लावली. छत्तीसगढ वक्फ बोर्डाचे माजी अध्यक्ष अब्दुल सलाम रिझवी, राज्य अल्पसंख्याक विभागाचे माजी अध्यक्ष महेंद्र छाबडा व बिलासपूर स्थित सामाजिक कार्यकर्ते शफीक अहमद यांनी याचिकेद्वारे छत्तीसगढ सरकारच्या परिपत्रकाला विरोध केला होता. अशा प्रकारची धार्मिक बळजबरी करणे घटनेच्या चौकटीत बसत नाही. एका विशिष्ट धर्मातील परंपरांचा उदोउदो करताना अन्य धर्मांना पूर्णपणे डावलून सरकारने घटनेने दिलेल्या धार्मिक स्वातंत्र्याच्या हक्काचे हनन आहे, असा युक्तिवाद त्यांनी केला होता. न्या. अमितेंद्र किशोर प्रसाद यांच्या न्यायासनासमोर या याचिकेवर सुनावणी झाली. त्याप्रसंगी सरकारचे परिपत्रक घटनेतील अनुच्छेद २८ (१)चे उल्लंघन करत नाही.

# इंदापूरचा 'बारामती ॲग्रो' साखर कारखाना बंद करण्याचा इशारा

**राज्य प्रदूषण नियंत्रण महामंडळाची नोटीस**

■ पुणे

**महाराष्ट्र** प्रदूषण नियंत्रण महामंडळाकडून इंदापूर तालुक्यातील शेळफळगडे येथील 'बारामती ग्रो लिमिटेड' (साखर आणि डिस्टिलरी युनिट) ला 'कारणे दाखवा' नोटीस बजावली आहे. प्रदूषण मंडळाने 'बारामती ग्रो'कडून पर्यावरण नियमांचे उल्लंघन झाल्याचा ठपका ठेवला आहे.



इंदापूर तालुक्यातील 'बारामती ग्रो लिमिटेड' कारखान्याला ७ दिवसांच्या आत लेखी स्पष्टीकरण देण्याचे आदेश महाराष्ट्र प्रदूषण नियंत्रण महामंडळाने दिले आहेत. महामंडळाच्या अधिकाऱ्यांनी ३ जुलै रोजी कारखान्याची प्रत्यक्ष पाहणी केली होती. आता यानंतर 'बारामती ग्रो लिमिटेड' कारखान्याकडून या आदेशावर ७ दिवसांत समाधानकारक उत्तर न मिळाल्यास कोणतीही पूर्वसूचना न देता कारखाना थेट बंद करण्याची कायदेशीर कारवाई केली जाईल, असा सज्जड इशारा महामंडळाने दिला आहे. महामंडळाच्या पाहणीत कारखान्याकडून २ एकरच्या कच्च्या तलावात प्रक्रिया न केलेले काळपट रासायनिक पाणी साठवणे, ते पाईपलाईनद्वारे थेट शेतीच्या कालव्यात सोडणे, खराब एचडीपीई लायनिंग आणि हायड्रोक्लोरिक सिडची असुरक्षित साठवणूक अशा ५ गंभीर त्रुटी आढळून आल्या आहेत.

# राष्ट्रीय वित्त प्राधिकरणाकडून राजेश एक्सपोर्टची चौकशी सुरू

■ मुंबई

**राजेश** एक्सपोर्ट कंपनीने चुकीच्या पध्दतीने महसूल सादर केल्याप्रकरणी नॅशनल फायनान्शियल रिपोर्टिंग ॲथॉरिटीने (एनएफआरए)सखोल चौकशी सुरू केली आहे, असे एनएफआरएचे अध्यक्ष नितीन गुप्ता यांनी सांगितले.

एनएफआरए ही लेखापरीक्षकांची शिखर संस्था आहे. त्यामुळे या संस्थेकडून होणारी चौकशी महत्त्वपूर्ण मानली जाते. गेल्या महिन्यात शेअर बाजाराची नियामक संस्था सेबीने एक आदेश जारी केला होता. त्यामध्ये राजेश एक्सपोर्टने प्रदीर्घ काळापासून महसूल चुकीच्या पद्धतीने सादर केल्याचे म्हटले होते. कंपनीच्या ताळेबंदात एकूण १५.५ लाख कोटी रुपयांची तफावत आढळून आल्याचे सेबीने म्हटले होते. राजेश एक्सपोर्टच्या अचानक वाढलेल्या प्रचंड महसुलामुळे सेबीची नजर या कंपनीकडे वळली होती. त्यानंतर मिळालेल्या प्राथमिक माहितीच्या आधारे सेबीने राजेश एक्सपोर्टच्या लेखापरीक्षकांची चौकशी करण्याचे आदेश एनएफआरएला दिले होते. उद्योजकांच्या 'फिक्की' या संघटनेने आयोजित एका कार्यक्रमादरम्यान एनएफआरएचे अध्यक्ष गुप्ता यांनी यासंदर्भात माहिती दिली.

# मिठी नदी प्रकल्पाचा खर्च २१ कोटी रुपयांनी वाढला

■ मुंबई

**मिठी** नदीतील प्रदूषण कमी करण्यासाठी सुरू असलेल्या बोगदा प्रकल्पाच्या खर्चात २१ कोटी रुपयांची वाढ झाली

**६०४ कोटींचा खर्च ६२५ कोटींवर गेला**

आहे. हा प्रकल्प खर्च ६०४ कोटींवरून ६२५.३४ कोटींवर पोहोचला आहे. बांधकामाच्या साहित्यावरील जीएसटी १२ टक्क्यांवरून १८ टक्के झाल्यामुळे हा अतिरिक्त खर्च होणार आहे.

ऑक्टोबर २०२१ मध्ये मे. जे. कुमार इन्फ्राप्रोजेक्टस आणि मे. मिशिगन इंजिनिअर्स जॉईंट व्हेंचर यांना ६०४.३० कोटींचे कंत्राट देण्यात आले तेव्हा पावसाळ्यासह ४ वर्षांत म्हणजेच २०२५ पर्यंत हे काम पूर्ण करणे बंधनकारक होते. मात्र या प्रकल्पाला ४ फेब्रुवारी २०२६ पर्यंत मुदतवाढ द्यावी लागली होती. आता जुलैमध्ये या चौथ्या टप्प्याचे काम अंतिम टप्प्यात असून, ९६.६७ टक्के काम झाल्याचा दावा केला जात आहे. बापट नाला व सफेद पूल नाला या भागातील सांडपाणी मिठी नदीत मिसळण्यापासून रोखण्यासाठी हा प्रकल्प अत्यंत महत्त्वाचा आहे. दरवर्षी पावसाळ्यात दूषित पाणी रस्त्यावर पसरते.

# भांडूपमध्ये बेस्ट बसची चार वाहनांना धडक

■ मुंबई

**भांडूपमधील** कोकण नगर येथील क्रिटिकल रुग्णालय परिसरात आज बेस्टच्या एका अनियंत्रित ई-बसने परिसरातील काही पादचाऱ्यांसह रस्त्यावरील अनेक वाहनांना जोरदार धडक दिली. या भीषण अपघातात वाहनांचे मोठे नुकसान झाले आहे. तर एक पादचारी गंभीर जखमी झाला.

बेस्टच्या ओशिवरा आगारातील ४२५/३२ मार्गावरील बस क्रमांक ४०४७ सकाळी साडेआठच्या सुमारास कोकण नगरकडे उजवे वळण घेत होती. मात्र, बसला वळण व्यवस्थित घेता न आल्याने चालकाने बस मागे घेतली. यावेळी बसच्या मागील भागाचा रस्त्याने चालत असलेल्या

**एक गंभीर जखमी**

४३ वर्षीय अतुल अनंत पडवे यांना धक्का लागला. त्यामुळे ते रस्त्यालगत असलेल्या झाडाच्या मोठ्या कुंडीत व बसच्या मागील भागामध्ये अडकले. घटनास्थळी उपस्थित नागरिकांनी बस ढकलून पादचाऱ्याची सुटका केली. मात्र, बसने पार्किंगमध्ये



उभ्या असलेल्या दोन दुचाकी व एका रिक्षाला धडक दिली. या अपघातात अतुल पडवे यांच्या दोन्ही मांड्यांना गंभीर दुखापत झाली असून, रक्तस्त्रावही झाला. बसच्या वाहकाने तत्काळ त्यांना उपचारासाठी मुलुंड येथील अग्रवाल रुग्णालयात दाखल केले. अपघाताची माहिती मिळताच बेस्टच्या विशेष बस निरीक्षकांनी घटनास्थळी दाखल होत परिस्थिती हाताळली.

# उद्धव ठाकरे नागपुरात रामरक्षा आंदोलन करणार

■ मुंबई

**पावसाळी** अधिवेशन संपल्यानंतर पुढील आठवड्यात नागपुरात उद्धव ठाकरेंच्या उपस्थितीत रामरक्षा आंदोलन करण्यात येणार आहे. राष्ट्रीय स्वयंसेवक संघाच्या बालेकिल्ला मानल्या जाणाऱ्या नागपुरातून या आंदोलनाची सुरुवात होणार असून, त्यानंतर विदर्भातील विविध जिल्ह्यांमध्येही आंदोलनाचा विस्तार केला जाणार आहे.

उद्धव ठाकरे यांनी घेतलेल्या आमदारांच्या बैठकीत अयोध्येतील श्रीराम मंदिरातील कथित दानचोरी प्रकरण, राज्यव्यापी रामरक्षा आंदोलन, संघटनाबांधणी, एसआयआर मोहीम यावर आढावा घेण्यात आला. बैठकीत उद्धव ठाकरेंनी आमदारांना राम मंदिरातील कथित दानचोरी प्रकरणावर राज्यभर आवाज उठवण्याच्या सूचना दिल्या. काँग्रेस, आम आदमी पक्ष आणि समाजवादी पक्षही या प्रकरणावर आक्रमक भूमिका घेत असल्याचे त्यांनी नमूद केले. त्यामुळे ठाकरे गटानेही राज्यभर आंदोलन उभारावे, असे मत त्यांनी व्यक्त केले.

# उपमहापौरांच्या पाहणी दौऱ्यावेळी नाशिकमध्ये अपघातच अपघात

■ नाशिक

**नाशिक** शहरात सुरू असलेल्या मुसळधार पावसामुळे जनजीवन विस्कळीत झाले असून, गंगापूर रोड परिसरात वाहतूक कोंडी, पाणी साचणे आणि अपघातांच्या घटनांमध्ये वाढ झाली. आज गंगापूर रोडवरील एका अपघाताची पाहणी करण्यासाठी नाशिकचे उपमहापौर विलास शिंदे घटनास्थळी उपस्थित असतानाच आणखी एक अपघात घडला. एक ज्येष्ठ नागरिक दुचाकीवरून जात असताना रस्त्यावरील खड्ड्यात दुचाकीचे चाक अडकल्याने त्यांचा तोल गेला आणि ते रस्त्यावर कोसळले.

याच परिसरातील खचलेल्या रस्त्यामुळे एक ट्रक अडकला. तसेच अनेक खासगी वाहने अडकून पडली. एक शाळेची बसही रस्त्यात अडकली होती. बस पलटी होण्याची शक्यता निर्माण झाली होती. वेळेत



मदत मिळाल्याने विद्यार्थ्यांना सुखरूप बाहेर काढण्यात आले. उपमहापौर विलास शिंदे यांनी प्रशासनाच्या नियोजनावर गंभीर प्रश्न उपस्थित केले.

रात्रीपासून मुसळधार पाऊस सुरू असून, या परिस्थितीबाबत आम्ही वारंवार प्रशासनाला सूचना दिल्या होत्या.

सिंहस्थ कुंभमेळ्याच्या तयारीसाठी केंद्र सरकार, राज्य सरकार आणि महापालिकेकडून कोट्यवधी रुपये खर्च केले जात आहेत. कामांचे योग्य नियोजन आणि ठेकेदारांशी समन्वय नसल्याचे स्पष्टपणे दिसून येत आहे. पावसाळ्यापूर्वीच बॅरिकेटिंग आणि सुरक्षाविषयक उपाययोजनांबाबत सूचना देण्यात आल्या होत्या. त्याकडे दुर्लक्ष करण्यात आले. आजच्या परिस्थितीसाठी संबंधित ठेकेदार आणि विभागीय अधिकारी जबाबदार आहेत.

# पुढील १० दिवस पावसाचा जोर कमी होण्याचा अंदाज

**शेतीची कामे करून घेण्याचे आवाहन**

■ मुंबई

**या जुलै** महिन्यात सुरुवातीला मुंबईसह पश्चिम महाराष्ट्रात मुसळधार पाऊस झाला असला, तरी राज्यातील बहुतांश भागांमध्ये अद्याप सरासरीपेक्षा कमी पाऊस नोंदविला गेला आहे. आज बुधवार ८ जुलैपासून राज्यातील बहुतांश भागांमध्ये पावसाचे प्रमाण लक्षणीयरित्या कमी होण्याचा अंदाज व्यक्त करण्यात आला असून, ही स्थिती पुढील किमान दहा दिवस कायम राहण्याची शक्यता आहे. त्यामुळे शेतकऱ्यांनी हवामानाचा अंदाज लक्षात घेऊन शेतीची कामे नियोजनबद्ध पद्धतीने करण्याचे आवाहन कृषी विभागाने केले आहे. जुलै महिन्याच्या सुरुवातीला मुंबई, कोकण आणि पश्चिम महाराष्ट्रातील काही भागांमध्ये अतिवृष्टी झाली. मात्र, राज्याच्या इतर भागांमध्ये पावसाचे वितरण असमान राहिले आहे. विशेषतः खानदेशातील धुळे व नंदुरबार, मध्य महाराष्ट्रातील अहिल्यानगर व सोलापूर, तसेच पश्चिम विदर्भ आणि मराठवाड्यातील काही जिल्ह्यांमध्ये अद्याप समाधानकारक पाऊस झालेला नाही. पुढील दहा दिवस सरासरीपेक्षा कमी पावसाची शक्यता आहे.

सविस्तर वाचण्यासाठी व शेअर करण्यासाठी हा क्युआर कोड स्कॅन करा

# फलटणमध्ये विजेच्या धक्क्याने एकाच कुटुंबातील चौघांचा मृत्यू

■ फलटण

**तालुक्यातील** खामगाव येथे घराबाहेरील विद्युत तारेला स्पर्श झाल्यामुळे विजेचा धक्का लागून एकाच कुटुंबातील चार जणांचा मृत्यू झाला. एकमेकांचे प्राण वाचवण्याच्या प्रयत्नात संपूर्ण कुटुंबच मृत्युमुखी पडल्याने खामगाव परिसरात हळहळ व्यक्त होत आहे.

किसन पिसुरड्या शिंदे (४८), गंगुबाई पिसुरड्या शिंदे (४६), सचिन पिसुरड्या शिंदे (वय २६) आणि आरती पिसुरड्या शिंदे (वय २२) अशी मृतांची नावे आहेत. खामगाव येथील खासगी इंग्लिश मीडियम शाळेजवळ शिंदे कुटुंब वास्तव्यास आहे. आज पहाटे साडेपाच ते सहा वाजण्याच्या सुमारास कुटुंबातील प्रमुख किसन शिंदे हे घराबाहेर जात होते. त्यावेळी अंधारात घराबाहेर एका विद्युत तारेला त्यांचा स्पर्श झाला. त्यांना विजेचा धक्का बसल्याचे पाहून त्यांची पत्नी गंगुबाई,



मुलगा सचिन आणि मुलगी आरती हे त्यांना वाचवण्यासाठी एकापाठोपाठ एक धावले. मात्र, वीजप्रवाह इतका तीव्र होता की, एकमेकांना वाचविण्याच्या प्रयत्नात चौघेही एकमेकांना चिकटले. काही सेकंदांतच या संपूर्ण कुटुंबाचा जागीच दुर्दैवी अंत झाला.